मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

# दैनिक युवक आधार मराठी

संपादक - संतोष शिवदास आमले


त्वरित पत्रकार पाहिजेत !
महाराष्ट्र व देशासह जगभरात डिजिटल माध्यमातून पोहचणारे दैनिक
PRESS
दैनिक युवक आधार मराठी
तरुणांचा बुलंद आवाज
महाराष्ट्रातील सर्व जिल्हे,तालुका, जिल्हा परिषद सर्कल,लोकसभा, विधानसभा या क्षेत्रांमध्ये पत्रकार पाहिजेत
अधिक माहिती साठी संपर्क
श्री संतोष शिवदास आमले
संपादक - ९२२०४०३५०९

| मुख्य संपादक - भारती आमले | उपसंपादक - श्री विलास गायकवाड | कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे | निवासी संपादक - श्री राकेश पाटील | सह संपादक - श्री मुकुंद कांबळे | महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

■ वर्ष : 3 ■ अंक : ९२ ■ बुधवार, १० डिसेंबर २०२५ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514

## तुकडेबंदी' शिथिल करणारे विधेयक विधानसभेत मंजूर

**दैनिक युवक आधार**

**मुंबई :** राज्यातील नागरी वस्त्यांमध्ये गुंठेवारी किंवा लहान भूखंडांवर राहणाऱ्या सुमारे ६० लाख कुटुंबांना म्हणजे, सुमारे तीन कोटी नागरिकांना दिलासा देणारे ऐतिहासिक तुकडेबंदी कायद्यातील जाचक अटी शिथिल करणारे 'महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५' आज विधानसभेत मंजूर करण्यात आले.विधेयकामुळे आता लहान भूखंडांची खरेदी-विक्री सुलभ होणार असून, संबंधित मालकांचे नाव स्वतंत्रपणे सातबारा उताऱ्यावर लागण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हे विधेयक विधानसभेत मांडले.

अनेक वर्षांपासून नागरी भागात ५-१० गुंठे किंवा त्यापेक्षा कमी जागेत घरे बांधून



राहणाऱ्या नागरिकांना मालकी हक्काच्या तांत्रिक अडचणींना सामोरे जावे लागत होते. तसेच, जमिनीच्या अकृषिक (NA) वापरासाठी वारंवार जिल्हाधिकाऱ्यांच्या परवानग्या घ्याव्या लागत होत्या. या नवीन विधेयकामुळे आता विकास आराखडा किंवा प्रादेशिक आराखडा मंजूर असलेल्या क्षेत्रात वेगळ्या 'एनए' परवानगीची गरज भासणार नाही. त्याऐवजी 'एक वेळचे अधिमूल्य' भरून ही प्रक्रिया पूर्ण करता येईल, असे या विधेयकात स्पष्ट करण्यात आले आहे.

### सातबारावर आता स्वतंत्र नाव लागणार

**कायद्याचा गैरवापर टाळा; विरोधकांच्या सूचना**

विधेयकावर चर्चा करताना शिवसेनेचे (उबाठा) आमदार भास्कर जाधव यांनी, "आमचा विधेयकाला तूर्त पाठिंबा नाही, याचा फायदा गरिबांऐवजी बिल्डर लॉबीला अधिक होण्याची शक्यता आहे," असे म्हटले. काँग्रेसचे पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी, "शहरांचे डीपी प्लॅन तयार नसताना केवळ जागा नियमित करून चालणार नाही, तर ९ मीटरचे रस्ते आणि गटारांची सोय कशी होणार, याचाही विचार व्हावा," अशी सूचना मांडली. त्याबरोबरच आमदार नाना पटोले, सुरेश धस, प्रवीण देटके, अमित देशमुख, राहूल कूल, कृष्णा खोपडे, हिरामन खोसकर, प्रशांत सोळंखे, अभिजित पाटील, संजय गायकवाड, रवी राणा यांनी बिलाबाबत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे कौतुक करत विधेयकाला पाठिंबा दिला.

**ग्रामीण भागासाठीही मागणी**

चर्चेदरम्यान आमदार चंद्रदीप नरके, विक्रम पाचपुते आणि रमेश बोरनारे यांनी हा निर्णय केवळ शहरांपुरता मर्यादित न ठेवता ग्रामीण भागासाठीही लागू करावा, अशी मागणी केली. पश्चिम महाराष्ट्रासह अनेक ठिकाणी धारण क्षमता कमी असल्याने तिथेही खरेदी-विक्रीत अडचणी येत असल्याचे सदस्यांनी निदर्शनास आणून दिले.

**बिल्डरांसाठी नाही, तर ६० लाख कुटुंबांसाठी**

चर्चेला उत्तर देताना महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट केले की, "हा कायदा कोणत्याही बिल्डरला फायदा देण्यासाठी आणलेला नसून, राज्यातील जी ६० लाख कुटुंबे लहान तुकड्यांवर घरे बांधून राहत आहेत, त्यांना कायदेशीर मालकी हक्क देण्यासाठी आहे."

बावनकुळे म्हणाले की, "या निर्णयामुळे कोणत्याही आरक्षणाला धक्का लागणार नाही. उलट, तुकड्याचा सर्वसामान्य माणूस आता कायदेशीर मालक होईल. १५ ऑक्टोबर २०२४ नंतर कोणालाही नव्याने तुकडा पाडता येणार नाही, मात्र तोपर्यंतच्या नागरिकांना याचा मोठा लाभ मिळेल. या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांनी स्थानिक लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊन कार्यवाही करावी," असे निर्देशही त्यांनी दिले.

**विधेयकाची ठळक वैशिष्ट्ये:**

- नागरी भागात जमिनीच्या अकृषिक वापरासाठी आता जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीची गरज नाही.
- नियोजन प्राधिकरणाने परवानगी दिल्यास 'एनए' परवानगी गृहीत धरली जाईल.
- गुंठेवारी आणि लहान तुकड्यांच्या खरेदी-विक्रीचा मार्ग सुलभ.
- ६० लाख कुटुंबांच्या सातबारा उताऱ्यावर स्वतंत्र नाव लागणार.
- सरसकट ग्रामीण भागात लागू नाही, परंतु रहिवासी क्षेत्र जाहीर झाल्यास लागू होऊ शकतो.

## थ्रो-बॉल स्पर्धेतील विजेत्यांचे लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून अभिनंदन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** गुरुकुल इंटरनॅशनल स्कूलतर्फे आयोजित 'गुरुकुल ऑलिम्पिक्स २०२५–२६' या थ्रो-बॉल स्पर्धेत रयत शिक्षण संस्थेच्या उलवे नोड येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलच्या संघाने उल्लेखनीय कामगिरी केली. त्याबद्दल रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते अभिनंदन करण्यात आला.



क्रीडा शिक्षक संग्राम फोफेरकर यांच्या मार्गदर्शनाखाली खेळणाऱ्या १४ वर्षाखालील मुलांच्या संघाने प्रथम क्रमांक मिळवून विजेतेपद पटकावले. या यशाबद्दल विद्यार्थी संघाचे स्कूल मॅनेजमेंट कमिटीतर्फे अभिनंदन करण्यात आले. या प्रसंगी रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य वाय. टी. देशमुख, आरटीपीएस खारघरच्या मुख्याध्यापिका राज अलोनी, लोकनेते रामशेठ ठाकूर स्कूलच्या मुख्याध्यापिका स्वप्नाली म्हात्रे, सीबीएसईचे मुख्याध्यापक अविनाश कुलकर्णी, रायगड विभागीय पीआरओ बाळासाहेब कारंडे, ऍड. राहुल घरत, तसेच शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलच्या मुख्याध्यापिका मुक्ता खटावकर आदी मान्यवर उपस्थित होते.

## पनवेलच्या बाजारपेठा नाताळ निमित्त सजल्या

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** नाताळ हा सर्ण सर्व जाती-धर्मातील नागरिकांकडून मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. विशेषकरून बच्चे कंपनीमध्ये या सणाचे विशेष आकर्षण असते. अवघ्या काही दिवसांवर नाताळ येऊन ठेपला असल्याने पनवेल परिसरातील विविध ठिकाणच्या बाजारपेठा सजावटीच्या साहित्यांनी सजल्या आहेत. ख्रिसमसनिमित्त होणाऱ्या सेलीब्रेशनची आतापासूनच जय्यत तयारी सुरु झाल्याचे दिसत आहे.

नाताळ जवळ आल्याने शहरांतील बाजारपेठा, दुकाने व मॉल्स ख्रिसमस ट्री, रंगीबेरंगी लाईट्स, बेल्स, स्टार्स, सांताच्या टोप्या, केक, सजावटीच्या वस्तू आदी



साहित्यांनी सजल्या आहेत. यानिमित्त बाजारपेठेत खरेदीसाठी नागरिकांची लगबग सुरू असल्याचे दिसून येत आहे. सध्यास्थितीत बाजारपेठेत सजावटीच्या वस्तूंमध्ये विविध आकारांचे ख्रिसमस ट्री, जिंगल बेल्स, विद्युत माळा (लाईट्स), स्टार्स, टिनसेल, बॉल्स आणि स्टॉकिंग्ज, ख्रिस्त जन्माचे साहित्य, मुखवटे आणि सांताक्लॉजच्या टोप्या दाखल झाल्या आहेत. तसेच खाद्यपदार्थांमध्ये विविध फ्लेवर्सचे केक, विशेषतः प्लम केकचीमागणी जास्त असते. त्यामुळे हे केक उपलब्ध करून देण्यावर दुकानदारांकडून भर दिला जात आहे. विशेषकरून लहान मुलांसाठी बाजारात सांताक्लॉजसारखे ड्रेस, कानटोपी, ग्लोज, शूज, पोतडी बॅग्जही आल्या आहेत. बच्चे कंपनीत सांताक्लॉजचे खास आकर्षण असल्याने चॉकलेट गिफ्ट घेवून येणाऱ्या सांताक्लॉजचे आकर्षक मुखवटे, टोपी यांची खरेदी आतापासून होतांना दिसत आहे. काही ठिकाणी साहित्याच्या किमतीत वाढ झाली आहे, तरीही उत्साहामुळे खरेदी सुरू असल्याचे दिसून येत आहे.

## संत जगनाडे महाराजांनी संत तुकाराम महाराजांचे विचार सर्वदूर पोहोचविले – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**नागपूर :** काही रुढीवादी लोकांनी संत तुकाराम महाराज यांच्या गाथा पाण्यात बुडविल्या, मात्र संत जगनाडे महाराज यांनीच त्या गाथा वाचवून तुकाराम महाराजांचे विचार सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहचविले, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.कौशल्य विकास विभागांतर्गत रामदासपेठ येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला संत जगनाडे महाराज यांचे नाव देण्यात आले, यावेळी आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा होते. यावेळी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आमदार कृष्णा खोपडे, माजी खासदार रामदास तडस अतिथी म्हणून उपस्थित होते.भक्ती संप्रदाय, वारकरी परंपरा ही महाराष्ट्राची ओळख असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, वारकरी संप्रदायाने उच्च-



नीच भाव संपवून अवघा महाराष्ट्र एक केला. या मालिकेत संत जगनाडे महाराज यांचे कार्य अतिशय मोठे आहे. समाजातील मनुष्यता जागृत करण्याचे कार्य त्यांनी केले असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना महापुरुषांची नावे देण्याच्या उपक्रमाचीही मुखमंत्र्यांनी प्रशंसा केली.मुख्यमंत्र्यांचे कार्यक्रमस्थळी आगमन होताच औक्षण करून त्यांचे स्वागत करण्यात आले. संस्थेच्या विद्यार्थिनींनी यावेळी लेझीम नृत्य सादर केले.

## काँग्रेसची ब्लु प्रिंट नेवासा शहराच्या विकासाला दिशा देणारी – अल्ताफ पठाण

**दैनिक युवक आधार**

**(नेवासा प्रतिनिधी )-** नेवासा नगरपंचायत निवडणुकीत काँग्रेस पक्षाकडून जाहीर करण्यात आलेली व सर्व घटकांचा समावेश असलेली नेवासा शहराच्या विकासाची ब्लु प्रिंट ही शहराच्या प्रगतीला दिशा देणारी ठरणार आहे असे मत नगराध्यक्ष पदाचे उमेदवार अल्ताफभाई पठाण यांनी व्यक्त केले.

नेवासा नगरपंचायत निवडणुकीत काँग्रेस पक्षाने आपला वचननामा प्रसिद्ध केला या वचननाम्यास नेवासा शहराच्या विकासाची ब्लु प्रिंट म्हणले आहे. या वचननाम्यात नागरिकांना केंद्रित ठेवून अनेक गोष्टी नमूद करण्यात आल्या आहे यात निवारा,शिक्षण,आरोग्य, रोजगार, पाणी, शहरातील स्वच्छता, सुंदरता, सुशोभीकरणं, या सुविधाबरोबर लहान



मुले, तरुण, महिला, जेष्ठ नागरिक, या सर्व घटकांचा विचार करण्यात आला आहे. तर काँग्रेसच्या या ब्लु प्रिंटला जनतेमधून मोठया प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे.

सर्वसमावेशक अशा वचननाम्यात प्रत्येक कुटुंबास हक्काचा जागेचा उतारा व हक्काचे घर, दररोज स्वच्छ पाणी पुरवठा, कचरामुक्त शहर,शहरातील नागरिकांच्या आरोग्यासाठी हॉस्पिटल, आंतरराष्ट्रीय दर्जाच्या प्राथमिक व माध्यमिक शाळा उभारणी, व्यावसायिकासाठी बीओटी तत्वावर व्यापारी संकुल उभारणी, तीर्थक्षेत्र विकास, महिलांना रोजगार, जेष्ठ नागरिकांना डोल, विद्यार्थ्यांना मोफत टॅब, स्पर्धा परीक्षा केंद्र, हेल्थ क्लब, शहराच्या सुंदरतेसाठी उद्यान,चौक सुशोभीकरण तसेच भ्रष्टाचारमुक्त नगरपंचायत, व सफाई कर्मचाऱ्यांना कायम स्वरूपाची नियुक्ती असे आश्वासन या ब्लु प्रिंट मध्ये देण्यात आले आहे. एकंदरीत सर्वसमावेशक असा वचननामा काँग्रेसने शहरातील नागरिकांना दिला आहे जो शहराच्या विकासाला निश्चित दिशा देईल.

> काँग्रेसच्या ब्लु प्रिंट मध्ये तरुणांचा विचार केला आहे यात मोफत हेल्थ क्लब,स्पर्धा परीक्षा केंद्र,शहरात मोफत वायफाय,विद्यार्थ्यांना मोफत टॅब या गोष्टी तरुणाना रोजगार निर्मिती करून देणाऱ्या आहेत. तरुण वर्ग या वचननाम्याचे नक्कीच स्वागत करणार
>
> - पंकज जेधे,युवा नेता नेवासा शहर.

> काँग्रेसच्या वचन नाम्यात जेष्ठ नागरिकांचा आवर्जून उल्लेख असून जेष्ठाना डोल, स्वतंत्र जॉगिंग ट्रॅक, मोफत आरोग्य तपासण्या या गोष्टी जेष्ठासाठी महत्वाच्या आहे. यामुळे या ब्लु प्रिंटचे जेष्ठा कडून स्वागत आहे
>
> - चांदभाई मन्सूरी, जेष्ठ नागरिक.

> काँग्रेसच्या ब्लु प्रिंटच्या माध्यमातून सर्व घटकांना न्याय मिळणार शहराच्या विकासाचे व्हिजन, विकासाची दूरदृष्टी यातून दिसून येते. सर्वसमावेशक असा वचननामा नागरिकांना नक्कीच भुरळ घालणारा असून शहरातील जनता या ब्लु प्रिंटचे नक्कीच स्वागत करणार
>
> - ऍड. राजुभाई इनामदार, जेष्ठ वकील, नेवासा.

## ९ वर्षीय अल्पवयीन मुलीवर अत्याचार; ७५ वर्षीय आरोपी पोलिसांच्या ताब्यात संतप्त नागरिकांचा मोर्चा

**दैनिक युवक आधार**

**बागलाण तालुका प्रतिनिधी - दिपक गायकवाड :** खमताणे (ता. बागलाण) येथे अल्पवयीन बालीकेवर अत्याचार केल्याची घटना तालुक्यातील घडली. ७५ वर्षीय नराधमाने ९ वर्षीय अल्पवयीन बालिकेवर अत्याचार प्रकरणी संशयित आरोपी नामदेव हरी गुंजाळ यास सटाणा पोलिसांनी दि.८ रोजी अटक केली असून अल्पवयीन मुलीच्या आईने पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेत पोलीस निरीक्षक योगेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय राऊत या घटनेचा तपास करीत आहेत.खमताने गावातील अल्पवयीन नऊ वर्षीय बालीकेवर नामदेव गुंजाळ हा आरोपी गेल्या सहा



महिन्यंपासून चॉकलेट, गोळ्याचे आमिष देऊन अश्लील कृत्य करत असल्याचे समोर आले असून नराधमाला पोलिसांनी ताब्यात घेतले असून सटाणा पोलिसात गु.र.नंबर ७७१/२५ भारतीय न्याय संहिता अन्वये ६४/२ म,६५/२,७४,७५,७६,७८,३५१/२ प्रमाणे गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

या घटनेचा निषेध म्हणून सटाणातील नाभिक समाज व इतर अन्य समाज घटक एकत्र येत मोर्चा काढण्यात आला. तालुक्यातील नाभिक समाज यांनी दुकाने बंद ठेवून झालेल्या घटनेचा तीव्र निषेध व्यक्त केलेला तसेच अत्याचार करणाऱ्या नराधमास फाशीची शिक्षा देण्यात यावी अशी मागणी निवेदनात संतप्त नागरिकांनी केली.

तालुक्यातील सर्व समाज घटक एकत्र येऊन संत सेना महाराज येथून मोर्चेस सुरूवात झाली.मुख्य रस्ता मार्गे सटाणा पोलीस स्टेशन येथे निषेध,घोषणाबाजी, निदर्शने करण्यात आली यात नराधमास फाशीची मागणी मुख्यतः होत होती. परिसरात प्रचंड जनसमुदाय जमला होता यावेळी भाजपा युवा मोर्चाचे माजी अध्यक्ष मंगेश खैरनार, शिवसेना जिल्हा अध्यक्ष लालचंद सोनवणे अत्याचारीस कठोर शिक्षेची मागणी केली.सामाजिक कार्यकर्ते यांनी राज्य महिला आयोग अध्यक्ष रूपाली चाकणकर यांनी प्रामुख्याने लक्ष देऊन पीडित बालिकेस न्याय मिळवून द्यावा असे मत व्यक्त झाले. मोर्चाकरांनी पोलीस निरीक्षक योगेश पाटील यांना निवेदन सादर केले.

> **१)मालेगाव तालुक्यात १६ तारखेला डोंगराळे येथील साडेतीन वर्षाच्या बालिकेवर अत्याचार करून खून;**
>
> **२)मालेगाव अल्पवयीन मुलीवर १३ वर्षीय बालिका के वर ५५ वर्षीय दीपक छाजेड संशयित आरोपीस अटक करून पोस्को अंतर्गत विनयभंग केल्याप्रकरणी गुन्हा.**

## सानपाड्यात परदेशी तरुणाच्या मृत्यूने खळबळ; पोलिसांनी मात्र सर्व आरोप फेटाळले

**दैनिक युवक आधार**

**नवी मुंबई :** सानपाडयात रविवारी पहाटे घडलेल्या परदेशी नागरिकाच्या मृत्यू प्रकरणात धक्कादायक माहिती पुढे आली आहे. मृत युवकाचे नाव ऍल्डी एडवर्ड जान असून तो स्वीडिश नागरिक आहे.

ऍल्डी हा इंग्लंडमध्ये शिक्षण घेत होता आणि त्याची मैत्री भारतातील प्रणय व इंडोनेशियातील एका मित्रासोबत झाली होती. ६ डिसेंबर रोजी वाशीतील रघुलीला मॉलमधील इम्पेरियल बँक्वेट येथे प्रणयचा विवाह होता. या विवाहासाठी ऍल्डी व इंडोनेशियन मित्र खास नवी मुंबईत आले होते. प्रणयने दोघांची राहण्याची व्यवस्था वाशीतील ऍबट हॉटेलमध्ये केली



होती.

६ डिसेंबरच्या मध्यरात्री दीड वाजता ऍल्डी लग्नसोहळ्यातून बाहेर पडला. त्यावेळी त्याने आपला मोबाईल फोन हॉलमध्ये विसरल्याचे समजले. हॉटेलकडे निघताना दिशाभूल होऊन तो सानपाडा सेक्टर १ मध्ये आला. येथील एका इमारतीतून चौथ्या मजल्यावर लिफ्टने गेल्यानंतर त्याला चुकीच्या इमारतीत आल्याचे जाणवले. बाहेर पडण्यासाठी त्याने गॅलरीतून उतरण्याचा प्रयत्न केला असता, तो चौथ्या मजल्यावरुन खाली पडून गंभीर जखमी झाला, अशी प्राथमिक माहिती तपासात समोर आली आहे.

प्रत्यक्षदर्शींनुसार, ऍल्डी रक्तबंबाळ अवस्थेत एका सोसायटीत मदतीसाठी धावत गेला. नागरिकांनी तत्काळ पोलिसांच्या हेल्पलाइनवर अनेकदा कॉल केले. परंतु पोलीस व वैद्यकीय मदत दीर्घकाळ मिळाली नाही, असा गंभीर आरोप नागरिकांनी केला आहे. पोलीस स्टेशन अवघ्या ३०० मीटरवर असूनही पोलीस तत्काळ आले नाहीत व वैद्यकीय उपचारातही मोठा विलंब झाला, असे नागरिकांनी सांगितले.

सानपाडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक देविदास कठाळे यांनी रहिवाशांचे सर्व आरोप फेटाळले आहेत.

# बाल आनंद मेळाव्यात पिठलं–भाकरीचा आस्वाद

## ७० स्टॉलमधून २५ हजारांची उलाढाल

**दैनिक युवक आधार**

**उपसंपादक महाराष्ट्र :- राजू शिंदे :** जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, तळणी येथे मंगळवारी (ता. ९) शालेय उपक्रमांतर्गत बाल आनंद मेळाव्याचे उत्साहात आयोजन करण्यात आले. सरपंच गौतम सदावर्ते व राष्ट्रवादी युवक जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर सरकटे यांनी मेळाव्याला भेट देत विद्यार्थ्यांच्या स्टॉलवरील पिठलं–भाकरी, कोथिंबीर पिठले यांसह विविध पदार्थांचा आस्वाद घेतला. यावेळी सुधाकर सरकटे, भागवत मुर्तरकर, जनार्धन आढळकर, डॉ. योगेश जोशी, किशोर हनवते, सचिन सरकटे, कल्याण जोशी, दारासिंग चंदेल, जयदेव मुर्तरकर, भागवत गूजर, स्वप्निल सरकटे, गणेश गूजर, कृष्णा वाघमोडे, गजानन सरकटे, गोपाल सरकटे, सौ. अर्चना सरकटे, सौ. कल्पना पातळे आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली.इयत्ता १ ते ४ मधील विद्यार्थ्यांनी तब्बल ७० स्टॉल उभारून पिठलं–भाकरी, दही–मठ्ठा, वडापाव, पाणीपुरी,



चना उसळ, पोंगे, भेळ, पोहे–चिवडा, इडली, आप्पे अशा विविध खाद्यपदार्थांची विक्री केली. पालक व ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विद्यार्थ्यांकडून मोठ्या प्रमाणात खरेदी केली. या विक्रीतून तब्बल २५ हजार रुपयांची उलाढाल झाल्याची माहिती मुख्याध्यापक एस. टी. धारतरकर यांनी दिली. उपक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक प्रल्हाद आघाव, मदन फड, किरण इंगळे, संदीप शेळके, राहुल सिरसाट, गजानन सरकटे यांनी परिश्रम घेतले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये आर्थिक साक्षरता, आत्मविश्वास आणि संवादकौशल्य विकसित होत असल्याचे शिवसेना तालुका संघटक ज्ञानेश्वर सरकटे यांनी सांगितले.

# पोलीस जाणीव सेवा संघ महाराष्ट्र राज्य – मुंबई मुख्य संपर्क कार्यालयाचे अंधेरीत भव्य उद्घाटन

**किशोर रमाकांत गुडेकर, मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख :** पोलीस बांधवांच्या सक्षमीकरणासाठी सातत्याने कार्यरत असलेल्या पोलीस जाणीव सेवा संघ महाराष्ट्र राज्य यांच्या मुंबई मुख्य संपर्क कार्यालयाचे भव्य उद्घाटन अंधेरी (पूर्व) येथे अत्यंत उत्साहात संपन्न झाले. संघाचे संस्थापक अध्यक्ष रविसर फडणीस यांच्या हस्ते रिबीन कापून कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले.

उद्घाटन सोहळ्यास पोलिस दलातील अनेक वरिष्ठ अधिकाऱ्यांची विशेष उपस्थिती लाभली. प्रमुख पाहुण्यांमध्ये अंधेरी विभागाचे सहायक पोलिस आयुक्त गजानन पवार, मेघवाडी विभागाचे सहायक पोलिस आयुक्त संपतराव पाटील, एमआयडीसी पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र वाणी, तसेच अंधेरी पोलिस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक रोहन सुर्वे आणि सहायक निरीक्षक प्रमोद मगर उपस्थित होते.

यावेळी मराठी चित्रपटसृष्टीचे दिग्दर्शक व निर्माते विनय कोठारी, महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिलचे उपाध्यक्ष ज्येष्ठ विधिज्ञ उदय वारंजीकर, तसेच पोलिस तपासचे मुख्य संपादक राजु जाधव यांनीही उपस्थिती दर्शवून कार्यक्रमास विशेष गती दिली.

संघाच्या वतीने





मुंबई प्रदेशातील विविध पदाधिकारी— महाराष्ट्र महाराष्ट्र राज्य संपर्क प्रमुख संजय शेकोकार, मुंबई अध्यक्ष तुषार रजपूत, मुंबई उपाध्यक्ष सदानंद रजपूत, क्राईम फोटोग्राफर दादा पराग रजपूत, प्रशांत शिंदे आदींनी या आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले.कार्यक्रमातील वैशिष्ट्यपूर्ण भाग म्हणजे पोलिस जाणीव सेवा संघाच्या माध्यमातून अनेक वेळा उत्कृष्ट बंदोबस्त बजावणाऱ्या पथकांचा सत्कार. ठाणे टीम आणि खार दांडा टीम यांना कार्यगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. या वेळी ठाणे जिल्हा अध्यक्ष अमित जगताप, उपविभाग प्रमुख अंजली खाणकरी, तसेच खार दांडा शाखा अध्यक्ष हरिश्चंद्र गोसावी, उपाध्यक्ष रूपेश मयेकर, सल्लागार खिमजी मजेठिया, चिनुभाई दाभी यांची टीम उपस्थित होती. उद्घाटन सोहळ्यास जालना जिल्हा अध्यक्ष किशोर नाटकर, परमेश्वर अपार, क्राईम रिपोर्टर हेमंत जैन, डॉ. राहुल राज गायकवाड, तसेच कानाजुरे, गणेश जाधव, भालचंद्र म्हात्रे, मुस्तफा सिद्दीकी, विश्वनाथ शिंदे, शांताराम पाटकर, सुनील मिश्रा, अवधूत नाईक, अक्षय गावडे, प्रशांत डाफळे, कार्तिकी अवसारे, लक्ष्मी बनसोडे, अनु साठे, ज्योती कदम, मल्लमा बोडा, निसार शेख, आणि प्रमोद मोहीते आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. पोलीस बांधवांची जाणीव जागृती, सामाजिक बांधिलकी आणि जनतेला न्याय मिळवून देणे हे पोलिस जाणीव सेवा संघाचे मुख्य ध्येय असून, नव्या कार्यालयाच्या माध्यमातून हे कार्य अधिक प्रभावीपणे करण्यात येणार असल्याचे संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

# डॅशिंग महिला समाजसेविका व माजी नगरसेविका नीतातांई माळी प्रभाग क्रमांक १८ मधून पुन्हा नशीब आजमावणार

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या विश्वासातली तसेच आमदार प्रशांत ठाकूर व युवानेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शानुसार एकनिष्ठेतेने काम करणाऱ्या डॅशिंग समाजसेविका तथा माजी नगरसेविका निताताई माळी या पुन्हा एकदा आपल्या हक्काच्या प्रभागात निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहेत. निताताई माळी या प्रभाग क्रमांक १८ मधून निवडणूक लढवणार आहेत अशी माहिती त्यांच्या निकटवर्तियांनी कोकण संध्याला दिली आहे. दरम्यान प्रभाग क्रमांक १८ हा शेकापक्षाचा बालेकिल्ला म्हणून प्रचलित होता मात्र आता त्याठिकाणी मागील निवडणुकीत निवडून आलेले तेव्हाचे माजी नगरसेवक यांनी आता भाजपात पक्षप्रवेश केला असल्याने शेकापक्षाची ताकद याठिकाणी उरलेली नाही. मात्र आता भाजपात प्रवेश केलेल्या याच उमेदवारांना आता स्थानिक लोकांच्या रोषाला सामोरे जावे लागणार असून त्याऐवजी याच परिसरात अनेक वर्षे वास्तव्यास असणाऱ्या व ३६५ दिवस प्रभागात फिरून प्रभागाचा विकास करणाऱ्या निताताई माळी यांनाच



भाजपाने तिकीट द्यावे तरच आम्ही भाजपाला मतदान करू असे मत येथील नागरिकांनी व्यक्त केले.

निताताई माळी या जय भवानी मित्र मंडळात असल्याने त्यांनी याठिकाणी विविध समाजोपयोगी कार्यक्रम राबविले असून ३६५ दिवस त्यांचा प्रभागात राबता असून विविध लोकांच्या अडचणी जसे कि रुग्णालय बिल कमी करणे, स्थानिक पोलीस ठाण्यात काही समस्या, तरुणांना रोजगार, महिलांसाठी विविध योजना, प्रभागातील रस्ते बनवणे, प्रभागातील शौचालये - गटारे दुरुस्ती करणे, छत्रपती संभाजी महाराज मैदान सुशोभीकरणाबाबत प्रशासनाशी पाठपुरावा करणे, प्रभागात पेव्हर ब्लॉक लावणे, सीसी गटार, व्यायाम शाळा, समाजमंदिर बांधणे यासारखे अनेक कार्य केले आहेत निताताई माळी यांना याआधी पनवेल नगरपालिकेचा दांडगा अनुभव असून त्या त्यावेळी प्रभाग क्रमांक ७ म्हणजेच आजचा प्रभाग क्रमांक १८ मधून लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या व जनतेच्या आशीर्वादाने काँग्रेस पक्षातून निवडून आल्या होत्या. प्रभाग क्रमांक ७ मध्ये त्यांनी विविध प्रकारचे लेखी पत्रव्यवहार करून त्याचा पाठपुरावा करून कामे मार्गी लावली होती तसेच त्या लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याशी एकनिष्ठ असल्याने त्यांची साथ कधीच सोडली नाही एक साधारण महिला ते नगरसेविका इथपर्यंतचा संघर्षमय प्रवास निताताई माळी यांनी केला असून त्याची पोचपावती देखील त्यांना वेळोवेळी मिळाली आहे तरी यामहानगरपालिका निवडणुकीत भाजपने त्यांना तिकीट देऊन प्रभाग क्रमांक १८ मध्ये कमळ फुलवावे अशी मागणी प्रभाग क्रमांक १८ मधील विशेषतः भुसार मोहल्ला, कापड बाजार, मांडवकर वाडा, भोपी चाळ येथील स्थानिक रहिवाश्यांनी केली आहे.

# विद्यार्थी- पालक उपविभागीय कार्यालय पेणवर मोर्चा काढून करणार

**शिक्षण हक्क सत्याग्रह**

**दैनिक युवक आधार**

**पेण दीपक लोके :** रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यात 50 शिक्षकांची पदे रिक्त असल्यामुळे मुंगोशी, कुरनाड, आनंदनगर, काळेश्री, कुहिरे आणि पाहीरमाळ सहा जिल्हा परिषद शाळांना सरकारने शिक्षक दिलेले नाहीत तसेच रोडे जिल्हा परिषद शाळा पहिली ते सातवीपर्यंत असून पटसंख्या 106 आहे पण या शाळेला फक्त तीन शिक्षक दिलेले आहेत त्यामुळे पहिली ते सातवी वर्गातील 106 मुलांना तीन शिक्षक शिकवणार कसे? तसेच वढाव, वडखळ, जावळीसह अशा अनेक शाळांची ही अवस्था आहे जिथे पटसंख्या असूनही शिक्षकांची संख्या अपुरी आहे. देवेंद्र फडणवीस सरकारने 7 ऑक्टोबर 2025 रोजी एक ते पाच पटसंख्याच्या शाळा बंद करण्याचा निर्णय घेतल्यामुळे पेण तालुक्यातील वरप, झापडी, गौळावाडीसह 29 शाळा बंद होणार आहेत त्यामुळे गरिबांची मुले शिकणार कशी? असा प्रश्न निर्माण झालेला आहे.

महाविद्यालयाला प्राध्यापक नाही, आश्रम शाळेतला शिक्षक नाही, परझड झालेल्या शाळा, शौचालय नाही, स्वच्छता गृह नाही, अपुरे शिक्षक, विज नाही, शाळेला कॉम्प्युटर नाही, बेंचेस नाही, शुद्ध पाणी नाही, ढासळलेली शैक्षणिक गुणवत्ता अशा परिस्थितीमध्ये सरकारी शाळा आहेत.

शिक्षणाच्या खाजगी कारणामुळे आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मुळे रायगड जिल्ह्यातील 300 पेक्षा अधिक शाळा बंद असून महाराष्ट्रातील सुमारे 10 हजार पेक्षा शाळा बंद झालेल्या आहेत. शिक्षणाच्या खाजगीकारणामुळे पहिली आणि दुसरीच्या मुलांचा शिक्षणाचा खर्च 35 ते 40 हजार रुपये, अकरावी बारावीचा खर्च 2 ते 3 लाख रुपये, एमबीएचा खर्च 5 ते 7 लाख रुपये, इंजिनिअरिंगचा खर्च 15 ते 17 लाख रुपये आणि डॉक्टर होण्यासाठी खर्च 70 ते 80 लाख रुपये येत आहे. त्यामुळे गरिबांची मुले शिक्षणाच्या मुख्य प्रवाहाच्या बाहेर फेकली गेलेली आहेत.

देवेंद्र फडणवीस सरकारकडे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, समृद्धी महामार्ग, शक्तीपीठ महामार्ग, देवनार तुरुंग, भांडवलदारांची कर्जमाफी, कुंभमेला यासाठी पैसा आहे परंतु शिक्षणासाठी पैसा नाही हे भयानक वास्तव समोर येत आहे, शिक्षण हे मूलभूत हक्क आहे आणि ते देणं केंद्र आणि राज्य सरकारची संविधानिक जबाबदारी आहे परंतु ती संविधानिक जबाबदारी सरकार स्वीकारत नाही हे आता समोर आलेले आहे.

म्हणूनच सर्वांना अंगणवाडी ते पदव्युत्तर डॉक्टर इंजिनियर होईपर्यंत मोफत शिक्षण मिळावे, शिक्षक आणि प्राध्यापकांची भरती करावी, संच मान्यता जीआर रद्द करावे, शाळा बंद करू नये अशा अनेक मागण्या घेऊन शिक्षक, विद्यार्थी, पालक यांचा 11 डिसेंबर 2025 रोजी उपविभागीय कार्यालयात पेण येथे मोर्चा काढून शिक्षण हक्क सत्याग्रह होणार आहे अशी माहिती संदीप रेणुका परशुराम पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली

**संदीप रेणुका परशुराम पाटील**
**सत्यशोधक सर्वोदय संघटना,**
**महाराष्ट्र**
**मु. पो. गागोदे ,पेण. रायगड.**

Best Opportunity For



House Wife
Retired
Teacher
Businessman

We are fastest growing organization
Work Fulltime or Part time as per your requirement
No Target, No Investment
Reward & Recognition
Opportunity For Domestic & International Trip

Hurry Up Limited Seats

Provident Fund + Medical Benefits
Education: 12th pass to Graduates
Entry Age: 30 years to 65 years

Earn Fixed salary upto Rs.30,000/- & incentives upto 2 lakhs p.m.

Gauri gaikwad:8898632067

# प्रकल्प स्तरीय विज्ञान प्रदर्शन आणि रोजगार मेळावा यशस्वी संपन्न

**दैनिक युवक आधार**

**सचिन बन्सोड प्रतिनिधी गोंदिया जिल्हा**

**(गोंदिया)** देवरी नगरातील आफताब मंगल कार्यालयात आज "प्रकल्प स्तरीय विज्ञान प्रदर्शन आणि रोजगार मेळावा २०२५" चे भव्य आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक दृष्टिकोनाला चालना देण्यासोबतच बेरोजगार तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प देवरी तर्फे आयोजित करण्यात आला होता.

प्रदर्शनात जिल्ह्यातील 34 आश्रमशाळेतील सुमारे 90 विद्यार्थ्यांनी आपले 53 हून अधिक नावीन्यपूर्ण प्रकल्प सादर केले. यात नवीकरणीय ऊर्जा, पर्यावरण संरक्षण, आरोग्य तंत्रज्ञान आणि कृषी-तंत्रज्ञान या क्षेत्रांतील प्रकल्पांचा विशेष समावेश होता.

विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन लायकराम भेंडारकर अध्यक्ष, जिल्हा परिषद गोंदिया यांच्या हस्ते झाले. त्यावेळी मंचावर संजू उईके नगराध्यक्ष प.स देवरी ,अनिलकुमार बिसेन सभापती पंचायत समिती देवरी,सविताताई पुराम , माजी सभापती जि.प.गोदिया उषाताई शहारे जिल्हा परिषद सदस्या, भारती सलामे सदस्या प.स .देवरी ममता अंबादे सदस्या प.स देवरी शिलाताई उईके



नगरसेविका अर्जुनी/ मोरगाव विवेक नागभीरे ,प्रभाताई सलामे तसेच परीक्षक म्हणून वर्मा सर, उमेश काशीद प्रकल्प अधिकारी मंचावर उपस्थित होते.

लायकराम भेंडारकर विद्यार्थ्यांना संबोधित करताना म्हणाले, "विज्ञान हा फक्त प्रयोगशाळेतील माणूस नसतो, तो समाजातील समस्या सोडवणारा बदल घडवणारा असतो. असे कार्यक्रम ग्रामीण भागात सुद्धा व्हायला हवे जेणेकरून दुर्गम भागातील विद्यार्थ्यांमध्ये व पालकांमध्ये जागृतता निर्माण होईल.

रोजगार मेळाव्यात 106 विद्यार्थ्यांनी उपस्थित राहुन.....

Resume Services, Nagpur* नामांकित कंपन्यांनी भाग घेतला. आयटीआय, आणि शिक्षण क्षेत्रातील कंपन्यांनी 50 हून अधिक जागांसाठी मुलाखती घेतल्या. त्याच दिवशी ..... तरुण-तरुणींना नोकरीचे ऑफर लेटर मिळाले, तर ...... जण apprentice साठी निवडले गेले.

कार्यक्रमाचे आयोजक तथा एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प देवरीचे प्रकल्प अधिकारी उमेश काशीद म्हणाले, "विज्ञान आणि रोजगार यांचा संगम घडवून आम्ही विद्यार्थ्यांना केवळ ज्ञान नव्हे तर भविष्यही देण्याचा प्रयत्न केला आहे. पुढील वर्षी हा कार्यक्रम आणखी भव्य दिव्य करण्याचा आमचा मानस राहील.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रकल्प कार्यालयातील अधिकारी,कर्मचारी,शिक्षक आणि प्रायोजकांचे मोलाचे सहकार्य लाभले. सायंकाळी तिन्ही गटातील विजेत्या विद्यार्थ्यांना रोख बक्षिसे, प्रमाणपत्रे आणि स्मृती चिन्ह देऊन गौरविण्यात आले.

**पुरस्कार प्राप्त विद्यार्थी**

प्राथमिक गटामध्ये सर्वोत्कृष्ट 76 गुण घेऊन *वॉटर लेवल आलाराम* या मॉडेल ला पहिले बक्षीस मिळाले.*किर्ती पुजारी वर्ग 7वा शासकीय आश्रमशाळा बिजेपार*

चंद्रभान जाळे अनुदानित आश्रमशाळा कोकणा वर्ग6 वा ( दुत्तीय )

दिलेश्वरी नाईक अनुदानित आश्रमशाळा येरंडी वर्ग6 वा (तृतीय)

माध्यमिक गटामध्ये 79 गुण घेऊन *माती विना रेती* *या मॉडेल्सला प्रथम पारितोषिक मिळाले चांदणी सेवता वर्ग 9 वा शासकीय आश्रमशाळा बिजेपार

रागिणी उईके अनुदानित आश्रमशाळा गोठणगाव वर्ग 10 वा (दुत्तीय)

कृष्णल पटले शासकीय आश्रमशाळा पुराडा वर्ग8 वा (तृतीय)

उच्च माध्यमिक गटामध्ये होम सेक्युरिटी आलाराम मॉडेल्सला प्रथम कुणाल भोयर शासकीय आश्रमशाळा मजितपूर* वर्ग 12 वा.

मोहिनी वट्टी शासकीय आश्रमशाळा बिजेपार वर्ग11 वा( दुत्तीय )

सेजल मडावी वर्ग 12 अनुदानित आश्रमशाळा सिरेगाव बांध या शाळेला(तृतीय) क्रमांक मिळाला हा उपक्रम खरोखरच "शिक्षण + कौशल्य + रोजगार" यांच्या त्रिवेणी संगमाचे उत्तम उदाहरण ठरला.

दैनिक युवक आधार हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# सुलोचना संतोष भगत यांना मातृशोक

दैनिक युवक आधार
पनवेल/प्रतिनिधी:



पनवेलमधून प्रकाशित होणाऱ्या रायगड पनवेलच्या मालक, मुद्रक, प्रकाशक सुलोचना भगत यांच्या मातोश्री साखरीबाइ कृष्णा पाटील यांचे वृध्दापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी त्या 82 वर्षांच्या होत्या.

घणसोली गावातील भजनीबुवा रमेश कृष्णा पाटील यांच्या त्या मातोश्री होत. शांत आणि मनमिळावू स्वभावामुळे त्या परिचित होत्या. त्यांच्यापश्चात पाच मुले, चार मुली, सुना, जावई, नातवंडे आणि पतवंडे असा परिवार आहे. पनवेलमधील रायगड पनवेलचे संपादक संतोष भगत यांच्या त्या सासूबाई होत्या. त्यांच्या पार्थिवावर घणसोली गावच्या (कौलआळी) स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांचा दशक्रिया विधी सोमवार दि. 15/12/2025 रोजी सकाळी 8 वाजता घनसोली जेटी येथे होणार आहे तर दिवस कार्य बुधवार दि. 17/12/2025 रोजी खंडोबा मंदिर येथील राहत्या घरी होणार असून भेटण्यासाठी 10 ते 12 व सायं. 5 ते 8 ची वेळ देण्यात आली असल्याचे पाटील कुंटूबियांकडून सांगण्यात आले.

# पाटोदा शहरातील क्रांतीनगर भागामध्ये नवीन विद्युत रोहित्र बसवले.

## ग्रामस्थांनी मानले आमदार सुरेश आण्णा धस यांचे आभार...

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी) -** पाटोदा शहरातील क्रांतीनगर भागातील २०० के.व्ही.डीपी जळाल्याची घटना घडली. या मुळे परीसर अंधारमय झाला होता. विद्युत पुरवठा खंडित झाल्याने या भागातील रहिवासी सह विद्यार्थी व व्यवसायी यांना त्रास सहन करावा लागला. या घटनेची तात्काळ दखल घेऊन आमदार सुरेश आण्णा धस यानी पुढाकाराने समस्या मार्गी लावली. पाटोदा शहरातील क्रांतीनगर भागामध्ये २०० के.व्ही.डीपी (ट्रान्सफर) जळाल्याची माहिती मिळताच माजी उपनगराध्यक्ष तथा नगरसेवक नय्युम भाई पठाण यांनी तात्काळ आष्टी/पाटोदा/शिरूर विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार सुरेश आण्णा धस यांच्याशी दूरध्वनीवर संपर्क साधून संपूर्ण परिस्थिती कळविली. या वर तात्काळ प्रतिसाद देत आमदार सुरेश आण्णा धस यांनी महावितरण अधिकाऱ्यांना तात्काळ डीपी ची व्यवस्था करण्याच्या सूचना दिल्या. त्या नुसार महावितरण कर्मचाऱ्यांनी तत्परतेने नव्या डीपी ची व्यवस्था करून ती लागलीच बसविण्याचे काम पूर्ण केले. आणि बंद असलेली लाईट सुरळीतपणे चालू केली. या मुळे क्रांतीनगर भागातील रहिवासी यांनी आमदार सुरेश आण्णा धस, माजी उपनगराध्यक्ष तथा नगरसेवक पठाण नय्युम भाई यांचे आणि महावितरणच्या सर्व कर्मचाऱ्यांचे मनापासून आभार मानले.



# मंत्री येणार म्हणून फक्त देखावा नको ३६५ दिवस प्रवाशांना सेवा द्या – परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

**दैनिक युवक आधार**
**नागपूर / रमेश औताडे :** हिवाळी अधिवेशन आपल्या शहरांमध्ये आहे त्यामुळे मंत्री कधीही भेट देऊ शकतात. त्यासाठी केवळ देखावा म्हणून प्रवासी सुविधा निर्माण करू नका! तर वर्षातील 365 दिवस प्रवाशांना त्यांच्या मूलभूत सुविधा मिळणे हे आपल्या कर्तव्य आहे. त्यादृष्टीने प्रयत्न करा.असे निर्देश परिवहन मंत्री तथा एस टी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी एसटी प्रशासनाला दिले आहेत.हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवसाचे कामकाज स्थगित झाल्यानंतर परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष



प्रताप सरनाईक यांनी नागपूरातील गणेशपेठ बसस्थानकाला अचानक भेट दिली . यावेळी मंत्री सरनाईक यांनी प्रसाधनगृह, उपहारगृह, चौकशी कक्ष, प्रवासी प्रतीक्षालय, चालक-वाहक विश्रांतीगृह यांसह सर्व महत्त्वाच्या विभागांची तपासणी केली.

चालक व वाहकांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. गरम पाण्याची उपलब्धता आणि इतर सुविधा सुधारल्याबद्दल चालक-वाहकांनी मंत्री महोदयांचे आभार मानले.तसेच बसची प्रतिक्षा करत असलेल्या NCC कॅडेट विद्यार्थी आणि प्रवाशांशी चर्चा करून त्यांच्या सूचनांचा आढावा घेण्यात आला.

महिला प्रवाशांसाठी विशेषतः स्ननदा मातांसाठी असलेल्या हिरकणी कक्षाची तपासणीही करण्यात आली. केवळ औपचारिकता पूर्ण करण्यासाठी हिरकणी कक्ष निर्माण करु नका ते अद्यायावत करून तिथे महिला कर्मचारी नियुक्त करा. असे निर्देश मंत्री सरनाईक यांनी दिले .

# येडूमाता गड परिसर यात्रेसाठी चार दिवस राखीव करा– ज्ञानेश्वर अहिरे

**दैनिक युवक आधार**
**लोणी प्रतिनिधी ज्ञानेश्वर साबळे**
: श्री. क्षेत्र पिंपळदरी येथील येडू मातेचा गड परिसर चार दिवस यात्रेसाठी राखीव करा अशी मागणी एकलव्य भिल्ल सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष ज्ञानेश्वर अहिरे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे. श्री. अहिरे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हंटले आहे की संपूर्ण राज्यातील आदिवासी भिल्ल समाजाचे आराध्य दैवत असलेल्या अकोला तालुक्यातील पिंपळदरी येथील येडू मातीची जत्रा चैत्र पौर्णिमेला मोठ्या भक्ती भावाने साजरी केली जाते संपूर्ण राज्यातून लाखो आदिवासी आपल्या मुलाबाळांसह यात्रेत सहभागी होतात. देवीची आदिवासी रूढीपरंपरे नुसार पूजा केली जाते. सदर देवस्थान वन विभागाच्या कार्यक्षेत्रात येते असे असतांनाही स्थानिक



लोकांनी अतिक्रमणे करून खूप जागा व्यापली आहे त्यामुळे यात्रेसाठी येणाऱ्या आदिवासींना थांबण्यासाठी जागा अपुरी पडते. नवस पुर्ण करण्यासाठी दोन दिवस अगोदरच आदिवासी या ठिकाणी आपल्या कुटुंबासमवेत मुक्कामास येतात परंतु स्थानिक शेतकरी त्यांना थांबण्यासाठी विरोध करून वाद निर्माण करतात त्यामुळे अनेक वेळा गावकरी आणि यात्रे करू यांच्यामध्ये संघर्ष निर्माण होतो. सदर देवस्थान वन विभागाच्या जमिनीवर आहे परंतु पिंपळदरी गावातील नागरिक यात्रेकरूंना विरोध करून येडू आई गड परिसरात थांबू देत नाहीत. त्यामुळे परिणामी नवस पूर्ण करण्यासाठी आलेल्या अनेक आदिवासी कुटुंबांना थांबण्यासाठी जागाच मिळत नाही.त्यामुळे मा. जिल्हाधिकाऱ्यांनी आदिवासींचे श्रद्धास्थान असलेल्या येडुआई गड परिसर यात्रेच्या तीन दिवस अगोदर व यात्रेच्या मुख्य दिवशी असे चार दिवस सदर परिसर यात्रेसाठी आरक्षित करावा त्यामुळे गावकरी व आदिवासींमध्ये संघर्ष होणार नाही व संपूर्ण राज्यातून आलेल्या भिल्ल समाजाला देवीची पूजा अर्चा करून नवस पूर्ण करता येईल. तरी जिल्हाधिकाऱ्यांनी त्वरित संबंधित अधिकाऱ्यांना आदेश देऊन योग्य निर्णय घ्यावा अन्यथा आदिवासींच्या भावना भडकल्यास त्यास शासनच जबाबदार राहील असा इशारा देखील ज्ञानेश्वर अहिरे यांनी दिला आहे. निवेदनावर

# माणगाव तालुक्यात शिवसेनेचा उबाठा गटाला मोठा धक्का!; वाढवण ग्रामस्थांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश..


**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी:-सचिन पवार**
**माणगांव रायगड माणगाव :-** जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीपूर्वी शिवसेनेला माणगाव तालुक्यात मोठी ताकद मिळाली असून वाढवण गावातील शेकडो ग्रामस्थांनी महिला भगिनींसह शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. मंत्री नामदार भरत शेठ गोगावले यांच्या नेतृत्वात हा पक्षप्रवेश सोहळा उत्साहात पार पडला. उबाठा गटाला मोठा धक्का मानला जात आहे,या पक्षप्रवेशामुळे जिल्हा परिषद मतदारसंघात शिवसेनेची ताकद लक्षणीयरीत्या वाढली आहे. यावेळी बोलताना मंत्री भरतशेठ गोगावले म्हणाले, “तुम्ही आमच्या सोबत आल्याचा तुम्हाला कधीच पश्चाताप होणार नाही, हा शब्द मी देतो.” तसेच तुमच्या प्रत्येक प्रसंग मी आणि शिवसेना परिवार नेहमी तुमच्या पाठीशी उभा असेल. विकास कामांची ही तर फक्त सुरुवात आहे. आम्ही फक्त बोलत नाही तर आम्ही विकास कृतीत उतरतो.वाढवण



ग्रामस्थांनी गावाचा विकास हा मुख्य उद्देश ठेवत शिवसेनेत प्रवेश केल्याचे सांगितले. मधल्या काळात नामदार भरत शेठ गोगावले यांच्या माध्यमातून या मतदारसंघात अनेक विकासकामे झाली असून त्याच विकासात्मक दृष्टिकोनाने प्रभावित होऊन गावकऱ्यांनी शिवसेनेवर विश्वास ठेवला.जिल्हा परिषद निवडणुका जवळ येत असताना होत असलेले हे प्रवेश शिवसेनेची ताकद दिवसेंदिवस वाढवणारे ठरत आहेत. त्यामुळे आगामी निवडणुकांमध्ये शिवसेनेला मजबूत स्थिती आणखी वाढली आहेयावेळी शिवसेनेचे पदाधिकारी शिवसैनिक

# नॅशनल कमिशन फॉर मेन बिल 2025" ला देशभरातून प्रतिसाद ; सामाजिक कार्यकर्ते सचिन गोल्हार यांचा विधेयकाला ठाम पाठिंबा

**दैनिक युवक आधार**
**राम कुंडलिक ढाकणे उरण**
**प्रतिनिधी :** या आठवड्यात संसदेत सादर झालेल्या " नॅशनल कमिशन फॉर मेन बिल 2025" ला देशभरातून वाढता पाठिंबा मिळत आहे. सामाजिक कार्यकर्ते सचिन गोल्हार यांनी या विधेयकाला जोरदार समर्थन देत सांगितले की, कायदेशीर, सामाजिक आणि मानसिक समस्यांना सामोरे जाणाऱ्या पुरुषांसाठी हे विधेयक अत्यंत आवश्यक आहे, कारण आतापर्यंत त्यांच्या तक्रारींसाठी कोणतेही स्वतंत्र संस्थात्मक व्यासपीठ उपलब्ध नव्हते.या विधेयकाद्वारे कायद्यानुसार राष्ट्रीय पुरुष आयोगाची स्थापना करण्यात येणार आहे. हा आयोग तक्रारींची चौकशी, कायद्यांमधील लिंगभेदाचे परीक्षण,



कायदेशीर सहाय्य आणि धोरणात्मक सुधारणा सुचविण्याचे अधिकार प्राप्त संस्था असेल.गोल्हार यांनी स्पष्ट केले की, खोटे किंवा अतिशयोक्त दावे अनेक पुरुषांचे करिअर, कुटुंब व आदर नष्ट करतात, तेही आरोप सिद्ध होण्याआधीच. विशेषतः लग्नसंबंधी वाद, घरगुती हिंसेचे आरोप, छळ प्रकरणे, मुलांच्या कस्टडीचे प्रश्न यामध्ये अनेक पुरुषांना योग्य मदत मिळत नाही व प्रतिनिधित्वही अत्यंत कमी असते.पुरुषांसाठी या विधेयकाचे फायदे. तक्रारी नोंदवण्याचे स्वतंत्र व्यासपीठ: कायद्यांचा गैरवापर व खोटे आरोप तपासण्यासाठी अधिकृत संस्था उपलब्ध. कायदेशीर सहाय्य व जलद प्रक्रिया: दीर्घकालीन खटल्यांमुळे होणारा आर्थिक व मानसिक थकवा कमी होण्याची शक्यता.

लिंगभेद असलेल्या कायद्यांचे पुनरावलोकन: न्यायप्रणालीचा चुकीचा वापर होत असल्यास त्याची वस्तुनिष्ठ तपासणी. मानसिक आरोग्याचे भान: पुरुषांवर सामाजिक दबाव असतो पण मदत मागण्याची प्रवृत्ती कमी, आयोग त्यासाठी सहाय्यक ठरू शकतो.गोल्हार यांनी सांगितले की हे विधेयक स्त्रीविरोधी नाही, तर समतोल, पुराव्याधारित न्यायव्यवस्था निर्माण करण्यासाठी एक महत्त्वाचा टप्पा आहे. त्यांच्या मते, खरी लिंगसमता म्हणजे कोणतेही लिंग असो प्रत्येकाला न्याय आणि संरक्षण मिळणे.

**पार्श्वभूमी :** अनेक वर्षांपासून विविध नागरिक संघटना व कायदे तज्ज्ञ लिंग-निरपेक्ष न्याय मागत आले आहेत. कायद्यांच्या गैरवापरावर वाढती चर्चा, पुरुषांच्या मानसिक आरोग्यावर होणारा परिणाम, आणि सामाजिक कलंक, या सर्व पार्श्वभूमीमुळे हे विधेयक राष्ट्रीय पातळीवर चर्चेत आले आहे. आगामी समिती चर्चेत या विधेयकाची सखोल तपासणी होणार, अशी माहिती गोल्हार यांनी दैनिक युवक आधार च्या पत्रकारांशी बोलताना दिली आहे, तसेच

# मुख्यमंत्री समृद्धी पंचायत राज अभियानातील GR वर राज्यभर संताप

## “आंधळं दळतोय आणि कुत्रं पीठ खातोय!” ग्रामपंचायतींना आर्थिक गर्तेत ढकलणारा शासनाचा निर्णय?

**दैनिक युवक आधार**
**खालापुर- संतोष शेवाळे**
**प्रतिनिधी**
राज्य शासनाने ‘मुख्यमंत्री समृद्धी पंचायत राज अभियान’ अंतर्गत घरपट्टी, पाणिपट्टी आणि दिवाबत्ती करांच्या थकबाकीवर 50% सूट देण्याचा जो निर्णय जाहीर केला आहे, त्याने गावोगाव प्रचंड खळबळ उडाली आहे. राज्यातील सर्व ग्रामपंचायतींमधील ज्या निवासी मालमत्ताधरकांनी मालमत्ता कर, पाणीपटटी आणि दिवाबत्ती कर इत्यादी करांच्या (सन २०२५-२०२६ या चालू वर्षाच्या पूर्ण रकमेसह, दिनांक १ एप्रिल २०२५ पूर्वीच्या एकूण थकबाकीच्या ५०% रक्कम मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियान अंमलबाजवणीच्या कालावधीत एक रकमी ग्रामपंचायतीकडे जमा केल्यास एकूण मूळ थकबाकीच्या रकमेस ५०% सवलत राहील. (म्हणजेच सन २०२५-२०२६ च्या पूर्ण करांची रक्कम + दिनांक १ एप्रिल २०२५ पूर्वीच्या करांची एकूण थकबाकी मिळून येणा-या रकमेचा ५०% रक्कम) . कागदावर हा निर्णय लोकाभिमुख वाटू शकतो, पण प्रत्यक्षात तो ग्रामपंचायतींच्या अर्थसंकल्पावर आणि गावांच्या विकासावर प्रचंड ताण आणणारा ठरू शकतो, अशी भीती स्थानिकांकडून व्यक्त केली जात आहे.

या GR मधील सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, सरकारने सवलतीची घोषणा केली असली तरी त्या सवलतीमुळे ग्रामपंचायतींचे उत्पन्न कमी झाले, तर त्या नुकसानीची भरपाई शासन करणार नाही. म्हणजेच, सवलत सरकारची… आणि तिची किंमत गावाने भरायची! यामुळे गावकऱ्यांमध्ये संतापाचे वारे जोरात वाहू लागले आहेत. अनेक नागरिकांनी हा निर्णय थेट अन्यायकारक असल्याचे सांगत विचारलं आहे की, “वेळेवर कर भरून प्रामाणिकपणे गावाचा विकास करणाऱ्यांनी काय चुकीचं केलं? आणि वर्षानुवर्षे कर न भरणाऱ्यांनाच बक्षीस का दिलं जातंय?”

गावकऱ्यांचा सूर आता आक्रमक होत चालला आहे. चहाटळ्यांपासून ते ग्रामसभांच्या दालनात एकच वाक्य वारंवार ऐकू येत आहे—“आंधळं दळतोय… आणि कुत्रं पीठ खातोय!”मेहनत करून वेळेवर कर भरणाऱ्यांना शिक्षा आणि थकबाकीदारांना सूट देण्याची ही कल्पना गावकऱ्यांना मान्य नाही. शासनाचे हे धोरण सर्वांगीण विकासाच्या नावाखाली ग्रामपंचायतींची कंबर मोडणारे असल्याची भावना दिवसेंदिवस तीव्र होत आहे.

ग्रामपंचायतींच्या दैनंदिन व्यवहारात कर वसुलीचा वाटा महत्त्वाचा असतो. स्वच्छता, पाणीपुरवठा, गटारी, रस्ते, वीजबिल, कर्मचाऱ्यांचे मानधन या सर्व कामांसाठी दरवर्षी लाखो रुपयांची गरज भासते. आता या उत्पन्नावरच 50% सूट लादल्यास अनेक गावांमध्ये विकासकामे ठप्प होण्याची शक्यता अधिक आहे. शासनाने सवलत जाहीर करून गावांच्या तिजोरीतला पाया खचवण्याचे काम सुरू केल्याचा आरोप ग्रामस्थ करत आहेत.

यापुढे अधिक गंभीर बाब म्हणजे, हा निर्णय स्वीकारायचा की नाकारायचा याची मुभा ग्रामसभेला दिली असल्याचे दिसते. पण ही ‘मुभा’ही प्रत्यक्षात दबावाचे साधन बनू शकते. शासनाचा आदेश एका बाजूला आणि ग्रामपंचायतींची आर्थिक वास्तविकता दुसऱ्या बाजूला या दोन्ही गोष्टींमध्ये समन्वय साधणे ग्रामसभेसाठी कठीण होणार आहे. स्वीकारला तर आर्थिक धोका, नाकारला तर सरकारी बोजा अशा अडचणीत ग्रामपंचायतींना ढकलले जात आहे.

या GR ने निर्माण केलेल्या परिस्थितीकडे पाहता गावकऱ्यांची नाराजी केवळ प्रशासनिक स्तरावर नाही, तर भावनिक पातळीवरही उफाळून आली आहे. “शासन निर्णय घेताना गावांचा विचार करते की केवळ आपली प्रतिमा?” हा प्रश्न थेट विचारला जात आहे. गावकऱ्यांना वाटते, सरकारने सवलतीचा ढोल पिटत स्वतःची लोकप्रियता वाढवायची आणि त्यासाठी गावांचा आर्थिक गळा आवळायचा ही पद्धत योग्य नाही.

एकूणच, शासनाचे हे धोरण जाहीर झाल्यापासून गावोगाव एकच चर्चा“सवलतीची जाहिरात सरकारची… पण दिवे विझण्याची वेळ ग्रामपंचायतीवर!”ग्रामपंचायतींच्या तिजोरीत भोक पाडणारा हा निर्णय पुन्हा

# जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा आष्टी नं.१ शाळेच्या वतीने राजमाता जिजाऊ माँसाहेब राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कारार्थी पत्रकार बोडखे, कदम, साबळे, शिक्षक ओटे, शिंदे यांचा सत्कार

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी :**
**मारुती सत्रे**
जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा आष्टी नं. १ या शाळेच्या वतीने राजमाता जिजाऊ माँसाहेब राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे, पत्रकार अविनाश कदम, पत्रकार आण्णासाहेब साबळे आणि तसेच आदर्श शिक्षक पुरस्कारार्थी शिक्षक संदिप ओटे व शिक्षक देविदास शिंदे यांचा सोमवारी शाळेत सत्कार करण्यात आला.

मराठा सेवा संघ प्रणीत तानुबाई बिरजे पत्रकार परिषद, आष्टी यांच्या वतीने विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना राजमाता 'जिजाऊ माँसाहेब राज्यस्तरीय पुरस्कार' देण्यात येत आहेत. यांतर्गत पत्रकारिता पातळीवर




ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे, आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम व दिव्यांग पत्रकार आण्णासाहेब साबळे यांना व शिक्षक क्षेत्रातून संदिप ओटे यांना हि पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल शाळेच्या वतीने फेटा बांधून, शालश्रीफळ देऊन गौरविण्यात आले. त्यांच्या पत्रकारितेतील उत्कृष्ट कामगिरीबद्दल हा सत्कार करण्यात आला.तसेच याच प्रसंगी शिक्षक संदिप ओटे यांना हि पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल आणि शिक्षक देविदास शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचाही सन्मान करण्यात आला.या कार्यक्रमात सेवानिवृत्त विस्तार अधिकारी सुरेश पवार, केंद्रप्रमुख त्रिंबक दिंडे, मुख्याध्यापक तयाराम गळगटे, शिक्षक राजेंद्र लाड, शिक्षक संपत एकशिंगे, शिक्षक बाळासाहेब तळेकर, श्रीकांत कारंडे, शिक्षिका ज्योती शिंदे, छबुबाई दहिफळे, ईला दंडवते, ज्योती शेगूळे, रेखा काळे, दिलशाद सय्यद,प्रतिभा हिंगे,इत्यादी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाळासाहेब तळेकर यांनी केले तर मुख्याध्यापक तयाराम गळगटे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. आभार प्रदर्शन श्रीकांत कारंडे यांनी

# नागावात बिबट्याचा धुमाकूळ!

## भरवस्तीत हल्ले, दोन जखमी; शाळा बंद – चौल-रेवदंडा-थेरोंडा परिसरालाही इशारा

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे अलिबाग प्रतिनिधी :** अलिबाग तालुक्यातील नागाव परिसरात बिबट्याने थेट मानवी वस्तीत शिरकाव करत भीतीचे साम्राज्य पसरवले आहे. अलिबाग फॉरेस्टलगतच्या भागात आज सकाळी बिबट्या वाड्यांमध्ये फिरत असल्याचे स्पष्ट झाले असून, दोघांवर हल्ला झाला असून एक जण जखमी झाल्याची प्राथमिक माहिती आहे. जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.घटनेची माहिती मिळताच वनविभाग आणि पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली.



बिबट्या सध्या एका वाडीत आश्रय घेतल्याचे निदर्शनास आले असून, त्याला सुरक्षितपणे पकडून स्थलांतर करण्यासाठी विशेष पथक तैनात करण्यात आले आहे. परिसरात शोधमोहीम सुरू असून नागरिकांना घराबाहेर न पडण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी कडक निर्णय – शाळा तात्पुरत्या बंद.सुरक्षेच्या दृष्टीने नागावमधील सर्व शाळा तात्पुरत्या बंद ठेवण्यात आल्या आहेत. नागावच्या सरपंच हर्षदा मयेकर यांनी पालकांना आश्वस्त करत सांगितले की, परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घेतली जात आहे. मुलांच्या सुरक्षिततेशी तडजोड होणार नाही. तसेच नागरिकांनी घाबरून न जाता प्रशासनाच्या सूचनांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन त्यांनी केले. वनविभागाचा दुजोरा – सावधानतेचे आदेश.अलिबाग फॉरेस्टचे अधिकारी भोईर यांनी बिबट्याच्या हालचालींना दुजोरा दिला असून, उघड्यावर फिरणे टाळा, जंगलालगत जाणे टाळा आणि कोणतीही अफवा पसरवू नये, असे आवाहन केले आहे.चौल-रेवदंडा-थेरोंडा व आसपासच्या नागरिकांना गंभीर इशारा.नागावमध्ये बिबट्याचा वावर स्पष्ट झाल्यानंतर चौल, रेवदंडा, थेरोंडा तसेच आजूबाजूच्या गावांतील नागरिकांनीही विशेष सावधानता बाळगावी, असा इशारा प्रशासनाने दिला आहे. सकाळ-संध्याकाळ एकट्याने फिरणे टाळावे, लहान मुले व ज्येष्ठ नागरिकांची विशेष काळजी घ्यावी, पाळीव जनावरे सुरक्षित ठिकाणी बांधावीत आणि बिबट्याचे दर्शन झाल्यास तात्काळ वनविभाग/पोलिसांना कळवावे, असे निर्देश देण्यात आले आहेत.भरवस्तीत बिबट्याने केलेल्या शिरकावामुळे तालुकाभर तणावाचे वातावरण निर्माण झाले असून, वनविभाग-पोलिसांची यंत्रणा पूर्ण सतर्क आहे. बिबट्याला मानवी जीवितहानी न होता सुरक्षितरीत्या पकडण्याला प्राधान्य देण्यात येत असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. परिस्थितीवर सतत लक्ष ठेवण्यात येत असून, लवकरच स्थिती सामान्य होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.




**उरणमधील अस्वच्छेतेचे गलिच्छ चित्र डॉ. मोरे यांचे लहान मुलांचे हॉस्पिटल, बिल्डिंग च्या खाली कचऱ्याचा ढिग, उरण नगरपालिका हा ढिग उचलण्यासाठी विसरली का?**

**तृप्ती भोईर उरण प्रतिनिधी**

## पनवेल मेल मोटर डेपोमध्ये 'Blood for Ambedkar' उपक्रमांतर्गत रक्तदान शिबिर उत्साहात संपन्न; ४० रक्तदात्यांचा उत्स्फूर्त सहभाग

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर):** भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनाचे औचित्य साधून, पनवेल येथील मेल मोटर डेपो (डाक विभाग) येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. 'All India Postal SC/ST Employees Welfare Association' च्या वतीने "Blood for Ambedkar" या वेगळ्या आणि सामाजिक संकल्पनेअंतर्गत हा उपक्रम राबवण्यात आला. या कार्यक्रमासाठी मेल मोटर सेवा, मुंबईचे वरिष्ठ व्यवस्थापक हेमंतकुमार सिंग हे विशेष निमंत्रक म्हणून उपस्थित होते. तर कार्यक्रमाचे




प्रमुख पाहुणे म्हणून 'All India Postal SC/ST Employees Welfare Association' चे सर्कल सचिव जयराम जाधव यांची प्रमुख उपस्थिती लाभली. मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. डॉ. बाबासाहेबांना केवळ शब्दांनी नव्हे तर कृतीने आदरांजली वाहण्यासाठी आयोजित केलेल्या या शिबिराला उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात एकूण ४० स्वयंसेवकांनी उत्साहाने रक्तदान केले. रक्ताचा तुटवडा भरून काढण्यासाठी आणि रुग्णांचे प्राण वाचवण्यासाठी डाक विभागातील कर्मचाऱ्यांनी दाखवलेली ही सामाजिक बांधिलकी कौतुकास्पद ठरली. "Blood for Ambedkar" या संकल्पनेद्वारे डॉ. बाबासाहेबांचे मानवतावादी विचार पुढे नेण्याचा प्रयत्न आयोजकांनी केला.

## नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे पनवेल परिसरातील वाहतूक आणि दळणवळण बदलणार

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर):** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सुरू होण्याच्या पार्श्वभूमीवर पनवेल परिसरातील वाहतूक आणि दळणवळण व्यवस्था पूर्णपणे बदलणारे महत्त्वाकांक्षी प्रकल्प वेगाने पूर्णत्वाकडे जात आहेत. यात विमानतळाच्या पूर्व प्रवेशद्वारासाठी तयार होणारा 'ईस्टर्न एंट्री इंटरचेंज' प्रकल्प अंतिम टप्प्यात पोहोचला असून, येत्या सहा महिन्यांत हा मार्ग वाहतुकीसाठी सुरू होण्याची शक्यता आहे.राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या ८०० कोटी रुपयांच्या निधीतून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ या प्रकल्पाचे काम करत आहे. 'क्लोव्हर लीप' इंटरचेंजमुळे पनवेल शहर, खांदेश्वर रेल्वे स्थानक परिसर आणि जेएनपीटी बंदरातून येणाऱ्या कंटेनर वाहतुकीला मोठा दिलासा मिळणार आहे. या प्रकल्पामध्ये फुलपाखराच्या आकाराचा विना-सिग्नल उड्डाणपूल आणि जोडरस्त्यांचे मोठे जाळे तयार केले जात आहे. या उड्डाणपुलामुळे गाढी नदीवरील खाडीमार्ग ओलांडून कंटेनर थेट विमानतळाच्या कार्गो प्रवेशद्वारापर्यंत विना-अडथळा पोहोचू शकतील, अशी या मार्गाची रचना करण्यात आली आहे. ईस्टर्न इंटरचेंजच्या धर्तीवर विमानतळाच्या उलवा बाजूस वेस्टर्न एंट्री इंटरचेंज या प्रकल्पाचे कामही सुरू आहे. या इंटरचेंजमुळे अटल सेतूवरून मुंबईच्या दिशेने आलेल्या वाहनांना थेट विमानतळ गाठणे शक्य होणार आहे. उड्डाणपूल, गोलाकार चौक आणि उंच मार्गांच्या जाळ्यामुळे नवी मुंबई आणि पनवेलचा विमानतळाशी अखंडित संपर्क साधला जाणार आहे. ही पायाभूत सुविधा पनवेल शहराच्या विकासाला मोठी गती देणारी ठरणार आहे. या प्रकल्पामुळे पनवेल शहरातील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. सायन-पनवेल महामार्ग, मुंबई-गोवा महामार्ग आणि अटल सेतू-पामबीच मार्गावरून येणाऱ्या प्रवाशांना विमानतळापर्यंत थेट पोहचता येणार आहे. कळंबोली सर्कल, खांदेश्वर तसेच पनवेल शहर या परिसरातील वाहनचालकांना या मार्गाचा सर्वाधिक लाभ मिळणार आहे.

## पनवेल बस आगारात प्रवाशांची लूट; ज्येष्ठ नागरिकाची १.४० लाखांची सोनसाखळी गर्दीत लंपास

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर):** राज्य परिवहन महामंडळाच्या पनवेल बस आगारात प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. रप्रवाशांच्या तुडुंब गर्दीचा फायदा घेत एका अज्ञात चोरट्याने ज्येष्ठ नागरिकाच्या गळ्यातील सोन्याचे दागिने हातोहात लांबवले.

या घटनेमुळे प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून बस आगार प्रशासनाने पोलिसांच्या मदतीने तात्काळ सुरक्षा वाढवण्याची मागणी होत आहे.

डेरवली गावातील



६१ वर्षीय ज्येष्ठ नागरिक सकाळी सव्वा अकरा वाजेच्या सुमारास आपल्या नातेवाईकांना सोडण्यासाठी पनवेल बस आगारात आले होते. एसटी बस येण्यास उशीर झाल्याने प्रवाशांची मोठी गर्दी जमली होती.

नातेवाईकांना बसण्यासाठी जागा मिळावी या हेतूने हे ज्येष्ठ नागरिक स्वतः गर्दीतून बसमध्ये चढले आणि त्यांनी आसन मिळवले. नातेवाईक बसमध्ये स्थिरावल्यानंतर ते खाली उतरले आणि बसपासून काही अंतरावर गेले असता, त्यांना आपल्या गळ्यातील सोन्याची साखळी चोरीला गेल्याचे लक्षात आले.

याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून, सुमारे १ लाख ४० हजार रुपये किमतीची सोनसाखळी आणि पेंडंट चोरीला गेल्याचे तक्रारीत नमूद केले आहे.

पनवेल बस आगारात चोरीच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत असून, चोरट्यांच्या वाढत्या हिमतीमुळे प्रवाशांच्या सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# लाडक्या बहिणींच्या विरोधात जाऊ नका, नाहीतर घरी बसावे लागेल : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक युवक आधार**

**नागपूर । प्रतिनिधी -** अझिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी प्रश्नोत्तराच्या तासात गुटखा तंबाखूच्या अवैध विक्री बाबतचा प्रश्न उपस्थित करण्यात आला त्यावेळी अवैध दारू विक्रीमुळे लाडक्या बहिणीचे संसार उघड्यावर पडत असून अवैध दारू विक्रीची मागणी लाडक्या बहिणींची आहे, अध्यक्षांनी निर्देश देऊनही कारवाही होत नसल्याचा मुद्दा भाजपच्या अभिमान्यू पवार यांनी मांडला त्यावेळी यावर उत्तर देताना लाडक्या बहिणींच्या विरोधात जाऊ नका नाहितर घरी बसावं लागेल असा इशारा दिला. हिवाळी अधिवेशनात राज्याच्या राजकारणातील अनेक महत्त्वाचे मुद्दे गाजले. अवैध दारूवर आळा घालण्याची लाडक्या बहिणींची मागणी असून, अध्यक्षांच्या निर्देशांनंतरही कारवाई होत नसल्यास ती चिंतेची बाब आहे. असे प्रशांत ठाकुर यांच्या गुटखा तंबाखूवर बंदी असूनही राज्यात शाळा कॉलेजच्या १०० मीटर परिसरात सर्रासपणे केली जाते. यावर आळा घालावा असा मुद्दा मांडला त्यावेळी अभिमन्यू पवार यांनी अवैध दारू विक्रीवर लाडक्या बहिणींची मागणी आहे असे मुद्दा उपस्थित केला. त्यावेळी विरोधी पक्षाच्या सदस्यांनी लाडकी बहिण,,,,,, लाडकी बहिण,,,, अशा घोषणा दिल्या. यावर उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसनी लाडक्या बहिणींच्या विरोधात जाऊ नका, घरी बसावं लागेल असा इशारा दिला. त्यांनी सांगितले की, लाडकी बहिण योजना सुरूच राहील सुरूच राहील आणि तिचे पैसे नियमित मिळतील, असेही त्यांनी स्पष्ट केले. या योजनेची तुलना इतर कोणत्याही योजनेशी करता येणार नाही, असेही फडणवीस म्हणाले. मुद्यायावर अस्लम शेख यांनी टेम्पो भरून अवैध गुटखा बाहेरच्या राज्यातून येत असतो टेम्पो मालासह पकडला जातो पण कारवाई होत नाही त्यामुळे अशा घटनेत आरोपीवर मोका सारख्या कायद्याचा वापर करून कारवाई करावी असा मुद्दा मांडला त्यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, अशा घटनेत मकोका सारखा कायदा लावता येत नाही त्यासाठी कायद्यात सुधारणा करावी लागेल तसा प्रस्ताव पाठविण्यात येईल असे सांगितले. अधिवेशनात राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांवर, विशेषतः रायगडमधील सुनील तटकरे यांच्यावर काही आरोपांच्या संदर्भातही चर्चा झाली. या आरोपांमागे कुणाचे पैसे आहेत, याचा शोध घेणे महत्त्वाचे असल्याचे मत व्यक्त झाले. त्याचबरोबर, नाना पटोले यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका बॅलेट पेपरवर घेण्याची मागणी केली, ज्यातून सत्ताधारी पक्षाच्या आत्मविश्वासावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले.

## थोडक्यात

### 21 डिसेंबर रोजी रोटरी महिला मॅरेथॉनचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** पनवेल महानगरपालिकेच्या साहाय्याने रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलने यावर्षीही रोटरी - महिला मॅरेथॉन रविवार 21 डिसेंबर 2026 रोजी सकाळी 6 वाजता वडाळे तलाव पनवेल येथे आयोजित केली आहे. दरवर्षी महिलांसंबंधीत अनेक विषय घेऊन होणाऱ्या या मॅरेथॉनला पनवेलमधील महिलांचा आतापर्यंत उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आला आहे. या वर्षीची मॅरेथॉन रन फोर वोट अशी आगळी वेगळी संकल्पना घेऊन येत आहे. पनवेल व परिसरातील लोकांमध्ये मतदानाविषयी जागरूकता आणि जागरूकता अभियानात महिलांचा सहभाग हेच या मॅरेथॉनचे उद्दिष्ट आहे. सहभागी महिलांना अनेक पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल ही पनवेल मधील सर्वपरिचित अशी एक सामाजिक संस्था असून पनवेलमधील डॉ .गिरीश गुणे यांच्या मार्गदर्शनाखाली काम करणाऱ्या या संस्थेने आजवर अनेक उत्तम प्रकल्प रोटरी घनदाट जंगल, वडाळे तलाव गणपती विसर्जन घाट हे पनवेलकर वासियांसाठी आणि सभोवतालच्या परिसरात राबविले आहेत. पनवेल परिसरातील महिलांना विनंती आहे की जास्तीत जास्त संख्येने या मॅरेथॉनमध्ये सहभागी व्हावे आणि शासनाच्या मतदान जागरूकता अभियानाला हातभार लावावा अशी विंनती प्रेसिडेंट रो. अनिल ठकेकर, सेक्रेटरी अतिष थोरात, प्रोजेक्ट चेअरमन सिकंदर पाटील आणि को चेअरमन ऋषिकेश बुवा यांनी केली आहे.

### रासपाकडे उमेदवारी अर्ज दाखल करा – जिल्हाअध्यक्ष हाके

**दैनिक युवक आधार**

**तालुकाप्रतिनिधी अशोक नवघरे**



**पाथरी :-** आगामी परभणी महानगरपालिका जिल्हा परिषद पंचायत समिती राष्ट्रीय समाज पक्षाचे संस्थापक अध्यक्ष माजी मंत्री महादेव जानकर यांच्या मार्गदर्शनाखाली पक्ष स्वबळावर लढणार असून निवडणूक लढण्यास इच्छुक उमेदवारांकडून पक्षांतर्फे अर्ज मागविण्यात आले आहेत अशी माहिती परभणी राष्ट्रीय समाज पक्षाचे जिल्हाध्यक्ष अशोक हाके यांनी सांगितले आहे जिल्ह्यांत राष्ट्रीय समाज पक्षाचे संघटन मजबूत झालेले आहे प्रास्तापित सत्ताधाऱ्यांना वैतागलेली जनता आता पर्याय शोधत असून राष्ट्रीय समाज पक्ष सामाजिक कार्यास अग्रेसर असलेल्या युवकांना नेतृत्वाची संधी देण्यासाठी आग्रही आहे असे अशोक हाके यांनी सांगितले परभणी महानगरपालिका मध्ये राष्ट्रीय समाज पक्ष स्वबळावर सर्वाचीसर्व जागा लढवणार आहे आज उमेदवारांची चाचपणी करण्यात येत आहे तर निवडणूक लढविण्यासाठी इच्छूक उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रांसह आपले उमेदवारी अर्ज राष्ट्रीय समाज पक्ष कार्यालयात जिल्हाध्यक्ष अशोक हाके यांच्या कडे दाखल करावे

### लासुर्णे ता .इंदापूर येथे प्रहार दिव्यांग दिन साजरा



**दैनिक युवक आधार**

**सणसर :-विकास क्षत्रिय :** इंदापूर तालुक्यातील लासुर्णे गावात 5 डिसेंबर रोजी ग्रामपंचायत मार्फत दिव्यांग दिन साजरा करण्यात आला कार्यक्रम करण्यात आला प्रहार अपंग संघटना परीटवाडी लासुर्णे गावातील दिव्यांग बांधव या कार्यक्रमास मोठया संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस सामाजिक न्याय विभाग पुणे जिल्हाअध्यक्ष सागर मिसाळ प्रहार संघटनेचे पुणे जिल्हा उपाध्यक्ष सुभाष इंगोले लासुर्णे गावचे सरपंच ॲड सागर पाटील उपसरपंच बाबा जाचक ग्रामविकास अधिकारी स्वप्नील गायकवाड ग्रामपंचायत सदस्य कर्मचारी उपस्थित होते. यावेळी आपल्या भाषणात सागर मिसाळ व सरपंच सागर पाटील यांनी दिव्यांगानां लागणारी सर्वतोपरी मदत केली जाईल असे आश्वासन देण्यात आले लासुर्णे गावचे दिव्यांग संघटनेचे अध्यक्ष चंद्रकांत कदम उपाध्यक्ष संतोष दळवी वैभव निंबाळकर मार्गदर्शक युवराज लोंढे सचिव बाबा शर्मा पुणे जिल्हासंपर्क प्रमुख गोकुळ भोसले सतीश पार्लेकर दादा माळी दिलीप रेटे ज्ञानदेव कुंभार आणि सर्व दिव्यांग बांधव व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नवा ट्रेंडसेटर ठरणारी महिंद्रा एक्सयूव्ही ७एक्स0 एसयूव्ही होणार सादर; 5 जानेवारीला होणार वर्ल्ड प्रीमियर

**दैनिक युवक आधार**

**पनवेल(प्रतिनिधी) :** भारतातील अग्रगण्य एसयूव्हीनिर्माती कंपनी महिंद्रा अँड महिंद्रा लिमिटेडने आज एक्सयूव्ही ७एक्स0 या आपल्या प्रीमियम एसयूव्हीश्रेणीतील आगामी महत्त्वाच्या सादर करत असलेल्या एसयूव्हीचे नाव जाहीर केले. केवळ चार वर्षांपेक्षा थोड्या अधिक कालावधीत तीन लाखपेक्षा जास्त जणांनी एक्सयूव्ही ७०० एसयूव्ही खरेदी केल्यामुळे कंपनीने भारतातील एसयूव्ही विभागात जोरदार मुसंडी मारली. ज्यामुळे एक्सयूव्ही ७०० एक गेमचेंजर ठरली त्या एक्सयूव्ही ७०० च्या या समृद्ध परंपरेवर आधारित एक्सयूव्ही ७एक्स0 त्या सर्व बाबींची उंची अधिक वाढवत नेत आहे.

प्रेरणा आणि उत्साह निर्माण करणारे




डिझाईन आणि अभियांत्रिकी असलेल्या या एसयूव्ही मध्ये एक्सयूव्ही ७०० च्या सिद्धहस्त सामर्थ्यासह उत्तम डिझाईन, तंत्रज्ञान, आराम आणि कामगिरी यांची जोड आहे. यामुळे केवळ काही बदल केलेली नाही तर खरोखरच अतुलनीय एसयूव्ही सादर केली जात आहे. प्रीमियम एसयूव्हीक्षेत्रातीलमहिंद्राच्या नेतृत्वाला अधिक बळकटी देण्यासाठी डिझाइन केलेली एक्सयूव्ही ७एक्स0 उद्याच्या एसयूव्हीसाठी पुन्हा एकदा मार्गदर्शक ठरण्यास सज्ज आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# उरण मधील नागरिकांचा सातत्याने होणारा अपघाताच्या निमित्ताने मृत्यू प्रवास

## नागरिकांना रस्त्यावरील यमपाशाची भिती


**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण प्रतिनिधी :** उरण ची प्रगती प्रामुख्याने औद्योगीकरण आणि मोठ्या पायाभूत सुविधा प्रकल्पामुळे झाले आहे. रस्ते व पुलांच्या संदर्भात अनेक मोठे विकास प्रकल्प सुरू आहेत ज्यामुळे या भागातील वाहतूक व्यवस्था पूर्णपणे बदलून गेली आहे. मुंबई आणि उरण मधील प्रवासाचा वेळ कमी झाला आहे .गव्हाण फाटा करळफाटा येथील उड्डाणपूलांची बांधकाम पूर्ण होत आहेत . यामुळे उरणची वाहतूक व्यवस्था आधुनिक होत आहे. परंतु अंतर्गत रस्त्यांची खराब असलेली स्थिती आणि अवजड वाहनांमुळे दिवसेंदिवस समस्या अजूनही तेवढ्याच वाढत आहेत. या सगळ्याचा गंभीर परिणाम म्हणजे अलीकडे अनेक भीषण ट्रेलर अपघात झाले त्यात अनेक लोकांचे बळी गेले आहेत. आणि वाहतुकीची मोठी कोंडी झाली आहे. या अपघातांमध्ये अवजड वाहनांची विशेषता वाहतूक आणि अति वेग हि प्रमुख कारणे असल्याचे दिसून येते.

२४नोव्हेंबर २०२३ मध्ये उलवे ते उरण बेलापूर मार्गावर कारची दुचाकीसह ट्रेलरला धडक बसून एकाचा मृत्यू तिघे जखमी, २५ ऑक्टोबर २०२४ उरण फाटा रोडवर लेन बदलणाऱ्या ट्रेलरच्या मागील चाकाखाली चिरडून एका २ वर्षाच्या मुलाचा मृत्यू तर त्याची आई गंभीर जखमी, ७ ऑगस्ट २०२४ नवी मुंबई जवळील जेएनपीए रोडवर एका रिक्षाला ट्रेलर ने धडक दिल्याने १ ठार आणि २ जण जखमी १३ ऑक्टोबर २०२५ बेलापूर उरण रोडवरील रेतीबंदर उड्डाणपूला जवळ ट्रेलर आणि डंपरची धडक झाली त्यात ट्रेलरच्या चालकाचा मृत्यू आणि डंपर चालक जखमी, २३ नोव्हेंबर २०२५ पनवेल उरण रोडवर भरदाव वेगात असलेली एसयूव्ही कारची कंटेनरला धडक बसली या भिषण अपघातात २ तरुणांचा मृत्यू तर २ गंभीर जखमी, आणि नुकताच८ डिसेंबर २०२५रोजी नवघर खोपटा रस्त्यावरील बामन लॉरी जवळ भरधाव ट्रेलर ने दुचाकीला धडक दिली त्यात भेंडखळ गावातील अमोल ठाकूर या तरुणाचा जागीच मृत्यू झाला. यावेळी संतप्त नागरिकांनी रस्ता रोको केला होता.

उरण मध्ये ट्रेलर अपघात यापुर्वीही असंख्य घडले आहेत यामध्ये कुणाचा पुत्र, पती, बंधु तर कुणाचा पिता गेला आहे. अशा अनेक घटना घडल्या आहेत.

उरण हे जेएनपीए पोर्टमुळे अवघड वाहतुकीचे प्रमुख केंद्र आहे. त्यामुळे ट्रेलर आणि कंटेनरचे अपघात वारंवार घडत आहेत या अपघातांचे मुख्य कारण म्हणजे भरधाव वेग ,अवैध पार्किंग आणि चालकांचा निष्काळजीपणा आहे . अवजड वाहने अनेकदा वेगाने चालवली जातात ज्यामुळे चालकांचे नियंत्रण सुटते, रस्त्याच्या कडेला अवैधपणे उभी केलेली अवजड वाहने अपघातांना कारणीभूत ठरतात. तसेच लेन कटिंग, चुकीच्या पद्धतीने ओव्हरटेक करणे ,आणि सुरक्षित अंतर न ठेवणे



यामुळे हे अपघात होतात.लांब पल्ल्याच्या प्रवासादरम्यान चालकांना येणारा थकवा हे देखील एक प्रमुख कारण आहे. काही ठिकाणी रस्त्यावरील खड्डे, अरुंद रस्ते,तर कधी कधी ट्रेलरचे यांत्रिक भाग निकामी झाल्यामुळे ही अपघात होत आहेत.

या वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे स्थानिक ग्रामस्थांनी अनेकदा रास्ता रोको आंदोलन केले आहेत, आणि प्रशासनाने वाहतूक व नियंत्रण ठेवण्यासाठी उपाययोजना कराव्यात अशी मागणी अनेकदा जनतेकडून होत आहे. अनेक आंदोलने ही याकरता झाली.पण तरीही एक दोन दिवस जात नाहीत तोच कुठेतरी भिषण अपघातांची बातमी कानावर येत आहे. आणि कुणाचे तरी घरी दुःखाचा डोंगर कोसळत आहे.हे कुठेतरी थांबलेच पाहिजे. उरणच्या नागरिकांचे जीव स्वस्त झाले आहेत का? रोजीरोटी साठी बाहेर गेलेला माणूस घरात येईपर्यंत आपला नाहीच असे प्रत्येक कुटुंबाला वाटत आहे.हा मृत्यूचा यमपाश कधी थांबणार?

अपघात झाल्यास कुटुंबीयांची परिस्थिती अत्यंत वाईट आणि हृदय द्रावक होते विशेषता उरण सारख्या औद्योगिक पट्ट्यात जिथे अपघातात बळी पडणारे अनेकदा घरातील कर्ते पुरुष, कमावणारे सदस्य असतात, तिथे संपूर्ण कुटुंबाला अनेक गंभीर समस्यांना सामोरे जावे लागते जर कमावणारी व्यक्ती अपघातात मरण पावली किंवा कायमची अपंग झाली तर कुटुंबांचे उत्पन्नाचे मुख्य साधन पूर्णपणे बंद होते. जखमी व्यक्तींच्या उपचारासाठी मोठा खर्च करावा लागतो. त्यासाठी अनेकदा कर्ज काढावे लागते आणि असलेली जमा उपचारासाठी खर्च होते. उपचारांचा खर्च, दैनंदिन गरजा आणि इतर खर्चामुळे कुटुंबावर कर्जाचा डोंगर वाढत आहे. मुलांचे शिक्षण, घराचे हप्ते, आणि इतर आर्थिक जबाबदाऱ्या कशा पूर्ण करायच्या? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे सापडतच नाही.

घरातील सदस्यांच्या निधनाचा किंवा अपंगत्वाचा कुटुंबाला मोठा धक्का बसतो, हे दुःख. पचवणे खूप कठीण असते कुटुंबातील इतर सदस्यांना विशेषता जोडीदाराला आणि मुलांना मोठी मानसिकता आणि असुरक्षितता जाणवते. आधार देणारी व्यक्ती गमावल्यामुळे कुटुंबाला एकटेपणा जाणवतो. आणि समाजात वावरणे कठीण होते .मुलांच्या मानसिकतेवर आणि शिक्षणावर अत्यंत वाईट परिणाम होतो. काही वेळा त्यांना अचानक अंगावर जबाबदारी पडल्याने शाळेत जाणे अर्धवट सोडावे लागते.

काही प्रकरणांमध्ये कुटुंबाला सामाजिक कार्यक्रमांपासून दूर राहावे लागते किंवा लोक त्यांच्याकडे वेगळ्या नजरेने पाहतात जर कुटुंबाला वेळेवर सामाजिक किंवा सरकारी मदत मिळाली नाही तर त्यांची स्थिती अजून बिकट होते. विधवा झालेल्या महिलांना किंवा अपंग व्यक्तींना नवीन नोकरी किंवा कामाच्या संधी मिळवणे कठीण होते.

अपघातानंतर किंवा सरकारी मदत उदाहरणार्थ मोटर अपघात दावा न्यायाधीकरण अंतर्गत मध्ये मिळवण्यासाठी खूप कायदेशीर प्रक्रिया आणि कागदपत्रांची पूर्तता करावी लागते. यात खूप वेळ आणि पैसा खर्च होतो. वारंवार पोलीस स्टेशन आणि न्यायालयाच्या फेऱ्या माराव्या लागतात त्यामुळे कुटुंबाचा त्रास वाढतो, थोडक्यात सांगायचे तर अपघातामुळे केवळ एका व्यक्तीचे जीवन उध्वस्त होत नाही तर संपूर्ण कुटुंबाचे आयुष्य आर्थिक भावनिक आणि सामाजिक स्तरावर कोलमडून पडते.

अपघात ग्रस्त कुटुंबीयांना मदत करण्यासाठी आणि भविष्यात असे अपघात टाळण्यासाठी दोन्ही स्तरांवर प्रशासकीय आणि सामाजिक स्तरावर उपाययोजना करणे गरजेचे आहे .अपघात झाल्यानंतर त्या कुटुंबाला लवकरात लवकर आधार मिळण्याची गरज असते. मोटर अपघात दावा न्यायाधिकाऱ्याकडे आणि नुकसान भरपाईसाठी दावा कसा? कधी करावा ?याबद्दल मोफत मार्गदर्शनाने मदत पुरवणे गरजेचे आहे .संजय गांधी निराधार योजना किंवा अपघात विमा योजना सारख्या शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी मदत करणे व स्थानिक सामाजिक संस्था आणि दानशूर व्यक्तीने एकत्र येऊन निधी उभारणे ,जखमी व्यक्तींच्या उपचारासाठी आर्थिक मदत मिळवून देणे, कुटुंबाला समुपदेशन आणि मानसिक आधार देण्यासाठी तज्ञांची मदत मिळवून देणे.

उरण मधील ट्रेलर अपघात थांबवण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजनांची गरज आहे अवजड वाहण्यासाठी वेग मर्यादा निश्चित करणे व त्याचे काटेकोरपणे पालन करणे, कंटेनर आणि ट्रेलरच्या वाहतुकी व नियंत्रण आणणे किंवा वेळेचे बंधन घालणे, रस्त्याच्या कडेला अवैधपणे उभ्या असलेल्या वाहनांवर कठोर कारवाई करणे, ट्रेलर साठी पुरेशी पार्किंग व्यवस्था उभारणे, रस्त्यांची दुरुस्ती ,खड्डे आणि खराब रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करणे, वारंवार अपघात होणाऱे ब्लॅक स्पॉट्स ओळखून तिथे दिशादर्शक फलक, स्पीड ब्रेकर्स, किंवा सिग्नल बसवणे, वाहतुकीचे नियंत्रणाच्या अवजड वाहन चालकांवर कठोर दंडात्मक आणि कायदेशीर कारवाई करणे ,वाहनांची नियमित यांत्रिक तपासणी करणे, वाहन चालक आणि स्थानिक नागरिकांमध्ये वाहतुकीच्या नियमां बद्दल सुरक्षिततेबद्दल जनजागृती करणे, या इत्यादी उपायोजनामुळे अपघात असताना वेळेवर मदत मिळू शकतात आणि भविष्यातील अपघातांची संख्या कमी होण्यास मदत होईल.

---

# कळमनुरी तालुक्यातील कुंभारवाडी जिल्हा परिषद् शाळेतील सहा विद्यार्थिनीं राज्याच्या संघात करणार प्रतिनिधित्व

**दैनिक युवक आधार**

**तालुका प्रतिनिधी -विजय खुडे :** कळमनुरी -तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा कुंभारवाडी (चा ) येथील सहा विध्यार्थीनि १९ वर्षांखालील महाराष्ट्र राज्य टेनिस बॉल क्रिकेट संघात निवड झाली.

या निवडीबद्दल शिक्षक व निवड झालेल्या विद्यार्थिनीचा सोमवारी ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

शाळेतील विद्यार्थिनींची क्रीडा स्पर्धेमध्ये राज्याच्या संघात निवड होण्याची ही पहिलीच वेळ आहे.

तालुक्यातील कुंभारवाडी जिल्हा परिषद् शाळेमाधील सहावी व सातवीच्या विद्यार्थिनींनी तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेअंतर्गत लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेत सहभाग



नोंदविला होता. या स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवत शाळेच्या संघाने जिल्हा स्तरावर जवळा बाजार येथे झालेल्या क्रिकेट स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळविला त्यानंतर या संघाने नंदुरबार येथे महाराष्ट्र राज्य टेनिस बॉल क्रिकेट असोसिएशनकडून आयोजित २४ व्या महाराष्ट्र राज्य ज्युनिअर मुले-मुली टेनिस बॉल चॅम्पियनशिप स्पर्धेत जिल्ह्याचे नेतृत्व केले. या स्पर्धेतील कामगिरीच्या जोरावर राज्य टेनिस बॉल क्रिकेट असोसिएशनचे पदाधिकारी कुरेशी यांनी हिंगोली संघातील पूनम कुरुडे, साक्षी वंजारे, नव्या गिराम, वर्षा जवादे, रश्मी जयस्वाल, जीविका जयस्वाल या सहा विद्यार्थिनींची राज्याच्या १९ वर्षांखालील टेनिस बॉल क्रिकेट संघामध्ये निवड केली. या निवडीबद्दल गटशिक्षणाधिकारी सुरेश सोनुने व गोरे साहेब विस्तार अधिकारी कळमनुरी यांनी त्यांचे अभिनंदन केले १८ ते २१ डिसेंबरदरम्यान आग्रा येथे राष्ट्रीय स्तरावर होणाऱ्या स्पर्धेत या विद्यार्थिनी राज्याच्या संघात खेळणार आहेत. या निवडीबद्दल सोमवारी गावकऱ्यांनी या विद्यार्थिनींसह त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षक मुख्याध्यापक श्री एम डी फोपसे. श्री टी एस कदम. श्रीमती एस एच राठोड मॅडम श्रीमती जे सि कांबळे मॅडम यांचा सत्कार केला. यावेळी केंद्रप्रमुख भगवान बेद्रे, शाळा व्यवस्थापन समितीचे रुक्माजी सरकुंडे, बापूराव जवादे, नवनाथ आमले, विठ्ठल फलटणकर, सुरेश जवादे, संजू जयस्वाल, राजू जयस्वाल आर्दीची उपस्थिती होती.

# आपल्यातलाच' हा शब्द तंतोतंत खरा करणारे केदार भगत : लोकनेते रामशेठ ठाकूर

## केदार भगत यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे शानदार उदघाटन

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** आपल्यातलाच हा शब्द तंतोतंत खरा करणारे केदार भगत असल्याचे गौरवोद्गार लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांनी काढले. ते भाजपचे शहर उपाध्यक्ष केदार भगत यांच्या प्रभाग १९ मधील संपर्क कार्यालयाच्या उदघाटन प्रसंगी बोलत होते. यावेळी आ. प्रशांत ठाकूर, ज्येष्ठ नेते जे. एम. म्हात्रे, प्रदेश कार्यकारणी सदस्य अरुणशेठ भगत, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, माजी विरोधी पक्ष नेते प्रीतम म्हात्रे, जयंत पगडे,



जिल्हा उपाध्यक्ष गणेश कडू, शहर चिटणीस अमित ओझे यांच्यासह माजी नगरसेवक व पदाधिकारी उपस्थित होते.

माजी खासदार रामशेठ ठाकूर पुढे म्हणाले की, सर्वांना सोबत घेऊन चालणार आणि निस्वार्थीपणे तसेच शिस्तबद्ध काम करणारा कार्यकर्ता पक्षातील नेत्यांना आवडत असतो.

त्यामुळे केदार भगत सर्वांना आवडतो. पक्ष वाढीसाठी तो कार्यरत असतो. जनसंपर्क कार्यालयातून कार्यालयात जो काम घेऊन येईल त्याचे काम पूर्ण केले जाईल अशी अपेक्षा आहे. केदार भगत हा सर्वांना आपल्यातलाच वाटतो म्हणून त्याने आपल्यातलाच हे वाक्य घेऊन पुढे चालत आहे.

हे कार्यालय जनतेसाठी कायम खुले राहील. केदार भगत हे वर्षभर अनेक उपक्रम राबवत असतात त्यामुळे ते नागरिकांच्या लक्षात राहतात. हे कार्यालय प्रशस्त असून पक्षाच्या शिस्तीला धरून काम करणारे आहे असे देखील ठाकूर म्हणाले. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली केदार भगत मित्रपरिवाराने विविध सामाजिक उपक्रमांतून जनतेची सेवा करत सातत्याने नेतृत्वाची कार्यक्षमतेची छाप उमटवली आहे. त्यामुळे प्रभागाच्या विकासासाठी सक्षम उमेदवार म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात आहे.

---

# शिष्यवृत्ती परीक्षेत 'उच्च जाती'चा प्रश्न

## भीम आर्मी व आजाद समाज पार्टी (कां.) यांचे मुख्यमंत्रीांकडे निवेदन संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करून निलंबित करण्याची मागणी

**दैनिक युवक आधार**

**उमरखेड तालुका प्रतिनिधी राजू गायकवाड :** ६ डिसेंबर २०२५ रोजी यवतमाळ जिल्हा प्राथमिक शिक्षण विभागामार्फत इयत्ता ५ वी ते ८ वी च्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेदरम्यान इयत्ता ८ वीच्या विद्यार्थ्यांना "उच्च जातिचे नाव काय?" असा प्रश्न विचारण्यात आला. या प्रश्नाचे दिलेले पर्याय — ब्राह्मण, क्षत्रिय, शूद्र, वैश्य — हे जातीय भेदभाव वाढवणारे, संविधानविरोधी आणि अत्यंत अनुचित असल्याचा आरोप आजाद समाज पार्टी (कां.) व भीम आर्मीच्या प्रतिनिधींनी केला आहे.

या गंभीर प्रकरणावर मुख्यमंत्री तथा गृहमंत्री मा. देवेंद्र फडणवीस साहेबांना निवेदन देण्यात आले. शिक्षणाच्या माध्यमातून समानता, बंधुता आणि सामाजिक न्यायाची भावना जोपासली जाणे अपेक्षित असताना अशा प्रकारचा प्रश्न विद्यार्थ्यांवर चुकीचा परिणाम करणारा असून समाजात जातीय दरी निर्माण करणारा आहे, असे निवेदनात म्हटले आहे.

सदर प्रश्न प्रश्नपत्रिकेत कोणाच्या जबाबदारीतून समाविष्ट झाला, याची तात्काळ चौकशी करण्यात यावी तसेच प्रश्नपत्रिका तयार व मंजूर करणाऱ्या यवतमाळ जिल्हा प्राथमिक शिक्षण विभागातील संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कार्यवाही करून त्यांना निलंबित करण्याची मागणी करण्यात आली.

तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी प्रश्नपत्रिका तयार करण्याची आणि अंतिम मंजुरीची प्रक्रिया अधिक काटकसरी, पारदर्शक व जबाबदारीची करण्याचे निर्देश देण्याची विनंती करण्यात आली आहे.

यावेळी अशोक भालेराव, जिल्हाध्यक्ष, भीम आर्मी यवतमाळ, राजकुमार भगत युवा जिल्हाध्यक्ष, आजाद समाज पार्टी (कां.), राहुल धुळे, वैभव सूर्यवंशी, अश्विन कांबळे आदी पदाधिकारी उपस्थित होते.


सदर प्रकरणामुळे विद्यार्थी व पालकांमध्ये निर्माण झालेली चिंता लक्षात घेऊन तातडीने सकारात्मक कारवाई करण्याची अपेक्षा निवेदनकर्त्यांनी व्यक्त केली.

# पांदण रस्ता प्रश्नी संतप्त इशारा: 'काम सुरू करा, नाहीतर उपोषण करून आत्मदहन!'

## २६ जानेवारी रोजी शेतकऱ्याचे शेतातच आमरण उपोषण

**दैनिक युवक आधार**

**उमेश साखरकर दिग्रस प्रतिनिधी :** तालुक्यातील डोळंबा येथील शेतमाल वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाचा असलेला डोळंबा ते वडगाव पांदण रस्ता मागील अनेक वर्षांपासून दुर्लक्षाच्या गर्तेत अडकला असून काम मंजूर असूनही प्रत्यक्षातील काम मात्र आजवर सुरू न झाल्यामुळे शेतकऱ्यांनी संताप व नाराजी व्यक्त केली आहे. स्थानिक शेतकरी संजय सुभाष राऊत यांनी या संदर्भात तहसिलदार मयूर राऊत यांना दि. ८ डिसेंबर रोजी पुन्हा एकदा लेखी निवेदन सादर करून तात्काळ काम सुरू करण्याची मागणी निवेदनातून केली आहे. सन- २०१६ मध्ये सदर पांदण रस्त्याला तांत्रिक मंजूरी व निधी मंजूर होऊनही प्रत्यक्ष कामाला सुरुवात न झाल्याने दरवर्षी पिकांचे,




शेतमालाचे व आर्थिक नुकसान होत असून कुटुंबाच्या उपजीविकेवर संकट निर्माण झाल्याचे त्यांनी निवेदनात नमूद केले आहे.सन- २०११ ते २०२४ या कालावधीत तहसिल कार्यालयासह संबंधित विभागांकडे अनेक विनंती अर्ज, स्मरणपत्रे व निवेदने देऊनही कामाच्या दृष्टीने कोणतीही ठोस हालचाल न झाल्याची खंत सदर शेतकऱ्याने व्यक्त केली आहे. यापूर्वी केलेल्या उपोषणावेळी तहसिलस्तरावर लेखी आश्वासन मिळूनही परिस्थितीत कोणताही बदल झाला नसल्याचेही त्यांनी नमूद केले आहे. सदर रस्त्याचे काम सुरू करण्याची मागणी २०१२ पासून करत असून आता कंटाळून मौजा डोळंबा येथील गट क्र. २०९/ब या त्यांच्या शेतातच आमरण उपोषण करून आत्मदहन करत असल्याचे निवेदनात म्हटले आहे. शेतापर्यंत पांदण रस्त्याची निकड अत्यंत तातडीची असून शेतमाल बाहेर काढण्यात अनेक अडचणी, तोटा व कष्ट वाढत आहेत. पिकाची नासाडी, खर्चवाढ, पाण्याच्या वाहतुकीतील अडथळे आणि वाहतुकीच्या खर्चातील वाढ यामुळे उपजीविकेच्या संकटाची वेळ आल्याचे त्यांनी सांगितले.


> डोळंबा- वडगाव या पांदण रस्त्याचे काम आम्ही शेतकऱ्यांनी लोकसहभागातून केले आहे. मी सातत्याने हा पांदण रस्ताचे काम सुरू करण्याची मागणी व पाठपुरावा गेल्या १२ वर्षांपासून करत आहे. आता मात्र कंटाळलो असून माझ्या शेतातच मला आमरण उपोषण करून आत्मदहन करण्याची परवानगी द्यावी.
>
> - संजय राऊत
> शेतकरी, डोळंबा

# शाळा-महाविद्यालयांच्या परिसरात गुटखा विक्री तात्काळ बंद करावी - आमदार प्रशांत ठाकूर यांची हिवाळी अधिवेशनात मागणी

## कडक कारवाईचे निर्देश; वेळ पडल्यास कायद्यात काही बदल करणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी)** : महाराष्ट्रातील अनेक शाळा आणि महाविद्यालयांच्या परिसरात गुटखा तसेच अमली पदार्थांची विक्री वाढत असल्याच्या गंभीर तक्रारी समोर येत आहेत. नियमांनुसार कोणत्याही शैक्षणिक संस्थेच्या १०० मीटर परिसरात अशा पदार्थांची विक्री संपूर्णपणे बंदीस्त आहे. मात्र, अनेक ठिकाणी टपऱ्या आणि स्टॉल्सद्वारे या नियमांचे सर्रास उल्लंघन होत असल्याचे निदर्शनास आले असून आमदार प्रशांत ठाकूर यांनी विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात शाळा-महाविद्यालयांच्या परिसरात गुटखा विक्री तात्काळ बंद करावी अशी मागणी करतानाच विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी केली.




तारांकित प्रश्नाद्वारे गुटखा व अंमली पदार्थ विक्रीचा गंभीर प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर यांनी दाखल केला होता. या प्रश्नाच्या अनुषंगाने विधिमंडळाच्या सभागृहात आमदार प्रशांत ठाकूर यांनी सदरचा विषय मांडत शासनाचे लक्ष या प्रश्नाकडे वेधले. महाराष्ट्रात शाळा आणि महाविद्यालयांच्या परिसरात गुटखा त्याचबरोबरीने अमली पदार्थांची विक्री वाढत असल्याची गंभीर तक्रार पुढे आली आहे. शासनाच्या नियमांनुसार शैक्षणिक संस्थांच्या परिसरात अशा पदार्थांची विक्री पूर्णपणे बंदीस्त आहे. तरीही अनेक ठिकाणी टपऱ्या आणि स्टॉल्स निर्बंधांचा भंग करत सुरू असल्याचे स्थानिक नागरिकांनी निदर्शनास आणले आहे. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी आणि त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने तातडीची उपाययोजना करण्याची मागणी नागरिक, सामाजिक संघटना आणि पालकांनी प्रशासनाकडे केली आहे. सदरच्या प्रश्नावर बोलताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी म्हंटले कि, गुटखा आणि अंमली पदार्थाची विक्री विद्यालयांच्या परिसरातील टपरी दुकानांवर सर्रासपणे होत असल्याची तक्रारी संपूर्ण महाराष्ट्रातून येत आहेत. या प्रश्नाच्या अनुषंगाने लेखी उत्तरात शाळा महाविद्यालय १०० मीटर परिसरामध्ये गुटखा तंबाखू सिगारेट विक्री करणाऱ्या टपरी, जनरल स्टोअर्स, किराणा दुकान यांचे अतिक्रमण काढण्याकरिता स्थानिक स्वराज्य संस्था यांच्यासोबत पोलीस ठाणे प्रभारी यांनी पत्रव्यवहार करावा आणि संयुक्त कारवाई पथक नियुक्त करण्यात आलेली आहेत, अशी माहिती शासनाकडून देण्यात आली आहे. मात्र जर अशी पथके नियुक्त करण्यात आली आहेत तर लोकप्रतिनिधींना त्याची माहिती मिळाली नाही. त्यामुळे प्रत्यक्षरित्या हा आदेश झाला असेल तर त्याची अमंलबजावणी कधी होणार आणि असे पथक नियुक्त केले असेल तर त्याची माहिती अधिकार फलकाप्रमाणे शाळा महाविद्यालयाच्या परिसरामध्ये लावण्याची आवश्यकता आहे आणि तक्रार केल्यानंतरही गुटखा अंमली पदार्थ विक्री करणाऱ्या टपऱ्या दुकानांना हटवले जाणार नसेल तर त्या पथकाला जबाबदार धरून त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे, अशीही मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी सभागृहात बोलताना केली. आणि या सर्व बाबीतून गुटखा व अंमली पदार्थ विक्रीचा महत्वपूर्ण विषय राज्य शासन दरबारी मांडून शासनाचे लक्ष केंद्रित केले.

गृह राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी उत्तर देताना सभागृहात सांगितले कि, गुटख्यावर बंदी असतानाही काही ठिकाणी अवैध विक्री होते. त्या संदर्भात पोलिसांनी महाराष्ट्रात वेगवेगळ्या ठिकाणी कारवाई केली त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले. या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आढावा घेतला आणि त्यानुसार गुटखा विक्री करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार शाळा महाविद्यालयांच्या परिसरातील पोलीस प्रशासनाने या टपरी दुकाने उध्वस्त करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेला कारवाई करण्याचे निर्देश दिले आहे. त्याचबरोबर या संदर्भात लोकप्रतिनिधींना माहिती देण्याकरिता तातडीने त्यांच्या ठिकाणच्या पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षकांना निर्देश देऊन तशी माहिती देण्यात येईल, असे आश्वासन दिले. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात बोलताना, गुटखा विक्रीवर कडक कारवाई झाली पाहिजे त्यासाठी निर्देश दिले असल्याचे सांगून त्या अनुषंगाने कारवाई करण्यासंदर्भात कायद्यात काही बदल करावे लागले तरी ते केले जातील, असे आश्वासित केले.

---

## उदगीर महसुल प्रशासनाची वाळू तस्कारावर मोठी कारवाई; वाळू चोरटी वाहतुक व साठा करणाऱ्या राजुकमार देवीदास गव्हाणे सह 16 जणांवर गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**

**उदगीर प्रतिनिधी बालाजी तेलंगे** : शहरातील ग्रामीण व शहर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील वेगवेगळ्या ठिकाणी 282 ब्रास वाळू चोरट्या मार्गाने आणून विक्री करण्याच्या उद्देशाने साठवणूक केली होती. ती वाळू महसुल प्रशासन व पोलिसांनी शुक्रवारी जप्त केली. तिची किंमत 14 लाख 10 हजार रुपये असून, याप्रकरणी ग्रामीण पोलिस ठाण्यात 10 व शहर पोलिस ठाण्यात 6, अशा एकूण 16 जणांविरुद्ध शनिवारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.काही दिवसांपासून अवैध मार्ग नी अनेक टिप्परमधून वाळूची चोरटी वाहतूक करण्यात येत असल्याच्या तक्रारी महसुल प्रशाशासनाकडे प्राप्त झाल्या होत्या. त्यानुसार ग्रामीण व शहर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील येणकी मानकी रोड, रेल्वे स्टेशनसमोर, समतानगर, जळकोट रोड परिसरात शुक्रवारी पोलिस व महसूल प्रशासनाने संयुक्त कारवाई करीत एकूण 282 ब्रास वाळू किंमत 14 लाख 10 हजार रुपये जप्त करण्यात आली. याप्रकरणी पोलिस कर्मचारी सरफराजखान गोलंदाज यांच्या तक्रारीवरून शहर पोलिस ठाण्यात अहमद अब्बास शेख, मोहम्मद इब्राहिम इसाक शेख, बालाजी संग्राम कुलाल, दस्तगीर चाँदखाँ पठाण, वजीर रफिउद्दीन कादरी, शादाब जागीरदार, तर ग्रामीण पोलिस ठाण्यात पोलिस कर्मचारी राजकुमार डबेटवार यांच्या तक्रारीवरून नंदकुमार सुभाष कुलाल, खदीर यादुल शेख, राहुल विश्वनाथ कांबळे, श्रीकृष्ण मुंडे, प्रभू हावगी बिरादार, श्यामलाबाई मंगेश देवणे, राजकुमार देवीदास गवाणे, लहू महादेव बिरादार, अंकुश महादेव बिरादार सर्व रा. उदगीर यांच्याविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## शालेय राज्यस्तरीय कुराश क्रीडा स्पर्धेमध्ये वाशिमचे पाच विद्यार्थी चमकले

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे जिल्हा प्रतिनिधी**

**वाशिम :** वाशीम क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे तथा जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, पुणे व कुराश असोसिएशन ऑफ महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने दि. 27 नोव्हेंबर ते 29 नोव्हेंबर 2025 दरम्यान शालेय राज्यस्तरीय कुराश क्रीडा स्पर्धा, शहा सांस्कृतिक भवन, इंदापूर जि. पुणे येथे पार पडल्या.या स्पर्धेमध्ये वाशिम जिल्ह्यातील 14,17 व 19 वयोगटातील बऱ्याच विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला व अमरावती विभागाचे नेतृत्व करून यामध्ये पाच विद्यार्थ्यांनी कांस्यपदक पटकावून आपले वाशिम जिल्ह्याचे नाव राज्यस्तरावर अधोरेखित केले. या सर्व १४ वर्षे वयोगटांमध्ये कु.जानवी विनोद



तुरूकमाने, आयुष सुभाष चंदनशिव तसेच 17 वर्षे वयोगटांमध्ये सचिन संतोष उंडाळ तसेच 19 वर्षे वयोगटांमध्ये कार्तिक कामठे व कु. श्रुतिका दत्तात्रय शिंदे हिने कांस्यपदक पटकावून आपल्या वाशिम जिल्ह्याचा ठसा उमटविला.या सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय प्राचार्य, मुख्याध्यापक, क्रीडा शिक्षक,आई-वडील तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी किशोर बोंडे सर, क्रीडा अधिकारी मारोती सोनकांबळे सर,तालुका क्रीडा अधिकारी मंगला शेंडे मॅडम,राज्य क्रीडा मार्गदर्शक अक्षय टेंभुर्णीकर सर व संतोष फुफाटे साहेब ,कुराश असोसिएशन चे श्री.राजेंद्र सौदागर सर तसेच वाशिम जिल्हा कुराश असोसिएशनचे अध्यक्ष श्री अनिल बोंडे सर, सचिव सौ.ज्योती राजेंद्र सौदागर,

फिल्ड आर्चरी असोसिएशनचे अध्यक्ष जगन्नाथ उगले सर तसेच वाशिम जिल्हा कुराश असोसिएशनचे पंच अपर्णा भुसकूटे, सिमा पाटील, ऋत्विक खंडारे, वैदेही कानगुडे, नितेश भिंगे सर, रामदास वायभासे सर यांना देतात. यावर्षी सर्वप्रथमच या सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या वाशिम जिल्ह्याचे नाव राज्यस्तरावर मेडल प्राप्त करून नावलौकिक केले. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना मेडल व प्रमाणपत्र कुराश असोसिएशन चे अध्यक्ष अंकुश नागर सर व सचिव शिवाजी साळुंखे सर यांनी देऊन गौरविण्यात आले या पाचही विद्यार्थ्यांचं त्यांच्या गावात जल्लोषात स्वागत करण्यात आले व कौतुक सोहळा सुद्धा पार पडला.

---

## जागतिक एड्स दिनानिमित्त अजिंठ्यात 'कॅन्डल रॅली'ने जनजागृती; गैरसमज दूर करण्यावर भर

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड:-** जागतिक एड्स सप्ताहानिमित्त एचआयव्ही/एड्स विषयी समाजात जनजागृती करण्यासाठी अजिंठा (ता . सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर) येथे एक प्रभावी 'मेणबत्ती (कॅन्डल) रॅली'चे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात नागरिकांच्या मनातील गैरसमज दूर करण्यावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले.



महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी, जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष, छत्रपती संभाजीनगर, आणि मराठवाडा ग्रामीण विकास संस्था अंतर्गत लिंकवर्कर प्रकल्पाच्या संयुक्त विद्यमाने ही रॅली काढण्यात आली. मराठवाडा ग्रामीण विकास संस्थेचे प्रकल्प संचालक अप्पासाहेब ऊगले आणि डी.आर.पी. प्रकल्प व्यवस्थापक अन्नपूर्णा ढोरे यांच्या नेतृत्वाखाली या उपक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

रॅलीनंतर आयोजित करण्यात आलेल्या मार्गदर्शनपर कार्यक्रमात उपस्थित महिला-पुरुषांना एचआयव्ही/एड्स आणि गुप्तरोगाची कारणे व लक्षणे याबद्दल सविस्तर माहिती देण्यात आली. एड्स संदर्भात समाजात असलेले विविध समज-गैरसमज दूर करण्यावर यावेळी विशेष भर देण्यात आला.

या जनजागृतीपर उपक्रमाला अजिंठा गावातील प्रतिष्ठित नागरिक, राजकीय पक्षाचे पदाधिकारी आणि समाजसेवकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ग्रामीण रुग्णालय अजिंठा येथील वैद्यकीय अधीक्षक दिनाजी खंदारे, आयसीटीसी सोयगावचे कौन्सिलर सुनीलजी वानखेडे, शिवसेना तालुका संघटक रघुनाथ चव्हाण, तसेच संस्थेच्या सुपरवायझर वनिता सिंगारे आणि लिंकवर्कर अरुण चव्हाण देशमुख यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या समारोपात लिंकवर्कर अरुण चव्हाण देशमुख यांनी उपस्थितांचे आभार मानले. एड्ससारख्या गंभीर विषयावर समाजात जागरूकता वाढवण्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला.

## आयएएस तुकाराम मुंढे अडचणीत

### भाजप आमदारांनी केली निलंबनाची मागणी

**दैनिक युवक आधार**

**नागपूर / प्रतिनिधी :** डॅशिंग आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडले आहेत. महाविकास आघाडी सरकारच्या काळात त्यांनी गैरव्यवहार केल्याचा आरोप करून भाजप आमदारांनी मंगळवारी विधानसभेत त्यांच्या निलंबनाची मागणी केली.

महाविकास आघाडी सरकारच्या काळात तुकाराम मुंढे नागपूर मनपा आयुक्त असताना त्यांनी शासनाची अधिकृत नियुक्ती नसतानाही नागपूर स्मार्ट सिटी प्रकल्पाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदाचा प्रभार नियमबाह्यपणे स्वतःकडे घेतला. सीईओचे अधिकार नसतानाही त्यांनी आपल्या मर्जीतील कंत्राटदारांना कोट्यवधी रुपयांची नियमबाह्य पेमेंट्स केली. तब्बल २० कोटी रुपये त्यांनी अशाप्रकारे दिल्याचा थेट आरोप भाजप आमदार कृष्ण खोपडे व प्रवीण दटके यांनी केला.

मुंढे यांनी स्मार्ट सिटी प्रकल्पातील महिला अधिकाऱ्यांना दमदाटी केली, तसेच १७ कर्मचाऱ्यांना विनाकारण निलंबित केल्याचा आरोप खोपडे यांनी केला. खोपडे यांनी सांगितले की, हा विषय सभागृहात उपस्थित केल्यामुळे मुंढे यांच्या समर्थकांकडून त्यांना जीवे मारण्याची धमकी मिळाली असून, आरोपीला तात्काळ अटक करावे आणि मुंढेंवर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली.

**सभागृहात गोंधळ**

सभागृहात हा मुद्दा उपस्थित झाल्यानंतर सत्ताधारी आमदार आक्रमक झाले. जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी यात हस्तक्षेप करीत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेतली असून चौकशी होईल आणि योग्य ती कारवाई केली जाईल, असे आश्वस्त केले.

मात्र, या उत्तरावर आमदारांचे समाधान न झाल्याने त्यांनी गोंधळ घातला. त्यामुळे तालिका अध्यक्षांनी सभागृहाचे कामकाज १० मिनिटांसाठी तहकूब केले.

कामकाज पुन्हा सुरू झाल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी यात हस्तक्षेप करत स्पष्ट केले की, या प्रकरणातील वस्तुस्थिती जाणून घेऊन लवकरात लवकर सभागृहात निवेदन केले जाईल.

---

## तीस वर्षांनंतर शालेय मित्रांची भेट

### जुन्या आठवणींना उजाळा,शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात येणार

**दैनिक युवक आधार**

**संतोष आमले :** आष्टी तालुक्यातील संत कैकाडी महाराज विद्यालय, वाळूज येथे 1996 साली दहावीच्या वर्गात असलेल्या माजी विद्यार्थ्यांची संवाद भेट 13 जानेवारी 2026 रोजी आयोजित करण्यात आली आहे. तब्बल तीस वर्षांनंतर आपल्या शाळेत परत भेटण्याचा आनंद आणि जुन्या आठवणींना उजाळा देण्यासाठी सर्व माजी विद्यार्थी उत्सुक आहेत.

या खास भेटीत माजी विद्यार्थ्यांकडून एक सामाजिक उपक्रमही राबविण्यात येणार असून, सध्या शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात येणार आहे. यात वह्या, पेन, ड्रॉइंग साहित्य, तसेच अन्य शैक्षणिक साहित्याचा समावेश असेल. शाळेबद्दलची




कृतज्ञता व्यक्त करण्याचा आणि नवीन पिढीला प्रोत्साहन देण्याचा हा उपक्रम ठरणार आहे.

शाळेचा परिसर तीस वर्षांनी पुन्हा एकदा जुन्या मैत्रीच्या गप्पा, आठवणी आणि भावनिक क्षणांनी नक्कीच उजळून निघणार आहे. माजी विद्यार्थ्यांच्या या भेटीची आतुरता सर्वांमध्ये असून, "पुन्हा भेटण्याची ही संधी आयुष्यातील खास क्षण ठरणार आहे," अशी भावना व्यक्त होत आहे.

## बारावर्षीय जलतरणपटू मयंक म्हात्रे यांनी भाऊचा धाक्का ते करंजा जेट्टी 24 किमी अंतर 7 तस 21मिनिटात पोहुन केला नवा विक्रम

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी प्रदीप पाटील**

: उरण हे जागतिक कीर्तीचे बेट असून सभोतली अरबी समुद्राच्या खडीने सरापरीसर व्यापलेला आहे त्यामुळेया बेटावर अनेक जलतरणपटू होऊन गेलेत या सर्वांच्या परंपरेचा वसा सांभाळतउरणच्या १२ वर्षीय मयंक म्हात्रे याने भाऊचा धाक्का ते करंजा जेट्टी हे 24 कि.मी.अंतर केवळ 7 तास 21 मिनिटे 6 सेकंदात पोहुन नवा विक्रम स्थापित केला आहे.त्यामुळे आज पर्यतच्या जलतरणपटू मध्ये मयंक म्हात्रे हा भाऊचा धक्का ते करंजा जेट्टी पोहून पार करणारा पहिला जलतरणपटू ठरला आहे. मयंक म्हात्रे हा उरणातील सेंटमेरीज कॉन्व्हेन्ट स्कुलमध्ये इयत्ता सातवी मध्ये शिकत आहे.त्याच्या नव्या विक्रमाचे सर्व स्थरामधून स्वगत करण्यात




आले असूनत्याचवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.सोमवारी पहाटे 03:55 वाजता भाऊचा धक्का येथून मयंकने समुद्राच्या लाटांवर झेप घेत आपल्या नव्या विक्रमाचा शुभारंभ केला,पहाटे समुद्रातदूरवर पसरलेला अंधार समुद्राच्या थंडपाण्याच्या स्पर्शा बरोबर मोकळ्या हवेंतील गार हवा, बरोबरीने उसळणाऱ्या सागरी लाटा मोठमोठ्या जहाजांचा मधून अडथळ्याची शर्यत यातून मार्ग काढत त्याने निर्धारीत वेळेत आपला विक्रम पूर्ण केला,त्याने केलेल्या या विक्रमची नोंद महाराष्ट्र राज्य हौशी जलतरण संघटनेने

> **समुद्रांतील बदलते हवामान आणि खडतर प्रवास यातून कुठेतरी मयंकाचा आजचा विक्रमी प्रवास मी थांबवण्याच्या पवित्र्यात होतो. मात्र मयंकची जिद्ध आणि इव्हेन्ट पूर्ण कारण्यासाठीची त्याचा कमालीचा आत्मविश्वास पहाता त्याला त्याच्या प्रयत्नासाठी साथ देण्याचा निर्णय घेतला, त्याने त्याने सर्व अडथळयांवर मात करीत भाऊचा धक्का ते करंजा जेट्टी हे 24 कि.मी.अंतर पोहून पार करणारा तो पहिला जलतरणपटू ठरला आहे.आता त्याला परदेशांतील चॅनेल पोहण्याचा विक्रम करावयाचा आहे मयकने आज केलेला विक्रम खूप कौतुकास्पद आहे. त्याने प्रयत्नाची शिकस्त करून आपला इव्हेन्ट पूर्ण केला. इतर जलतरणपटूनी मयंक म्हात्रे कडून प्रेरणा घ्यावी आणि आपल्या प्रयत्नांना नावे पंख द्यावेत.**
>
> **– दिनेश म्हात्रे, मयंकचे वडील**

दखल घेतली असून त्याच्या विक्रमची नोंद केली आहे. याआधी कु.मयंकने धरमतर ते करंजा आणि घारापुरी ते करंजा हे प्रवाह पोहून पार केले होते तर आज त्याने भाऊचा धक्का ते करंजाजेट्टी हे 24 कि.मी.अंतर केवळ 7 तास 21 मिनिटे 6 सेकंदात पोहून पार केलेहे अरबी समुद्रांतील उरण-मुंबई-करंजा खाडीतील तिनही प्रवाह प्रथम पोहून पार करण्याचा मान व त्याच्या विक्रमाची नोंद मयंकच्या नावाने झाली आहे.करंजा जेट्टीवरमयंक म्हात्रे याचे आगमन होताच करंजा गावांतीलसामजिक कार्यकर्ते तथा समाजसेवक सचिन डाऊर व करंजा ग्रामस्थांनी त्याचे जल्लोषात स्वागत करूनत्याचे अभिनंदन केले.

# घरकुल धारकांचे थकित हप्ते तात्काळ जमा करावेत

## ठिय्या आंदोलनाचा व्यंकटेश्वर प्रतिष्ठानचा इशारा

**दैनिक युवक आधार**

**सेलू प्रतिनिधी शिवाजी पवार :** तालुक्यातील विविध घरकुल योजनांचे थकित हप्ते तात्काळ जमा करण्यात यावेत, अन्यथा बेमुदत ठिय्या आंदोलन छेडण्याचा इशारा व्यंकटेश्वर प्रतिष्ठानने दिला आहे. या संदर्भात गटविकास अधिकारी, सेलू यांना आज प्रतिष्ठानच्या वतीने निवेदन देण्यात आले.



निवेदनात नमूद केल्याप्रमाणे पीएम आवास योजना, मोदी आवास योजना, रमाई आवास योजना तसेच अहिल्यादेवी होळकर आवास योजनांचे हप्ते मागील अनेक महिन्यांपासून जमा झालेले नाहीत. या योजनांमधून लाभ घेणारे अनेक लाभार्थी आर्थिकदृष्ट्या दुर्बल असून त्यांनी उसनवारी, उधार व व्याजाने पैसे घेऊन घरकुलाचे बांधकाम पूर्ण केले आहे. मात्र सरकारकडून हप्ते न मिळाल्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती अधिकच बिकट झाली आहे.

लाभार्थ्यांनी वारंवार गटविकास कार्यालयात चकरा मारूनही समाधानकारक उत्तरे मिळत नसल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. "लोकांच्या चपला झिजल्या, पण आपल्या कार्यालयाकडून फक्त उडवा-उडवीची भूमिकाच मिळाली," असा उल्लेख प्रतिष्ठानने केला आहे.या सर्व परिस्थितीचा गांभीर्याने विचार करून थकित हप्ते तात्काळ लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात यावेत. अन्यथा सर्व लाभार्थ्यांना सोबत घेऊन गटविकास कार्यालयात बेमुदत ठिय्या आंदोलन करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा व्यंकटेश्वर प्रतिष्ठानने दिला आहे.निवेदन देताना जयसिंग शेळके, विनोद धापसे, गणेश शेवाळे, किशोर शिंदे, सतिश गटकळ, नामदेव पवार, प्रद्युम्न आंधळे, अनिकेत काष्टे, बाबा शेळके आदी मान्यवर उपस्थित होते.

# येरगी येथे लोकसहभागातून वनराई बंधाऱ्याची उभारणी

**दैनिक युवक आधार**

**तालूका प्रतिनिधी :महादेव उप्पे**

देगलूर(दि.०८)देगलूर तालुक्यातील चालुक्य कालीन नगरी येरगी येथे आज दिनांक ०७ डिसेंबर २०२५ रोजी मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत लोकसहभाग, श्रमदान आणि सामाजिक उत्तरदायित्वाच्या माध्यमातून स्वच्छता व जलसंधारणाचा आदर्श प्रकल्प राबविण्यात आला. यावेळी ग्रामपंचायत हद्दीतील सामाजिक आवारे,रस्त्याच्या दुतर्फा,शाळा पटांगण,अंगणवाडी,आरोग्य उपकेंद्र आणि इतर सार्वजनिक ठिकाणांमध्ये जनसमृद्ध स्वच्छता अभियान उत्साहात पार पडले.याचबरोबर हरितगाव उपक्रमांतर्गत पाणी साठवणुकीसाठी गावालगतच्या ओढ्याजवळ वनराई बंधारा उभारण्यात आला.पाणीटंचाईवर मात करण्यासाठी व भूजलपातळी वाढविण्यासाठी सर्वाधिक प्रभावी मानल्या जाणाऱ्या या बंधाऱ्याचे काम



ग्रामस्थांनी अवघ्या अर्ध्या दिवसात श्रमदानातून पूर्ण केले अशी माहिती संतोष पाटील यांनी दिली.तर गावातील तरुण, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांनी एकत्र येऊन जबाबदारीची जाणीव ठेवत जलसंधारणाचा जिवंत आदर्श घालून दिला.या वनराई बंधाऱ्याचे महत्त्वहजारो लिटर पाणी अडवून जमिनीत जिरवले जाणार,यामुळे विहिरी,बोअरवेल व पाणवठ्यांच्या पातळीत लक्षणीय वाढ अपेक्षित असल्याचे सांगितले जात आहे. यावेळी उन्हाळ्यातील पाणीटंचाईवर प्रभावी नियंत्रण, साठवलेले पाणी शेती, जनावरांचे पाणी व घरगुती उपयोगासाठी महत्त्वाचे असल्याचेही यावेळी बोलत होते.पावसाळ्यानंतर पाणी वेगाने वाहून न जाता जमिनीत झिरपण्यास मदत होते व स्वस्त,परिणामकारक व समुदायाधारित उपाय,कमी खर्चात मोठा फायदा मिळवून देणारा बंधारा असल्याचे सांगितले जात आहे.तसेच जैवविविधतेला चालना, वाढलेली आर्द्रता झाडे,वनस्पती आणि परिसरातील जैवसाखळी मजबूत करण्यास मदत होत असल्याचे निदर्शनास आले.यावेळी येरगी ग्रामस्थांच्या एकजूट हा आदर्श आहे. उभारलेला वनराई बंधारा आगामी उन्हाळ्यात गावासाठी वरदान ठरेल असे मत संतोष पाटील यांनी व्यक्त केले.

नांदेड जिल्हयाचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले,जिल्हा परिषद नांदेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांच्या मार्गदर्शनाने आणि ग्रामस्थांच्या उत्स्फूर्त सहभागातून पूर्ण झालेल्या या जलसंधारण प्रकल्पामुळे येरगी गावाने पुन्हा एकदा श्रमदान,लोकसहभाग आणि पर्यावरण संरक्षणाचा उत्तम नमुना घालून दिला आहे.

यावेळी 'पाणी वाचवा,पाणी साठवा'ही फक्त घोषणा नसून कल्याणकारी कृतीतून साकारलेला संकल्प आहे.या उपक्रमाला सरपंच संतोष पाटील ग्रामपंचायत सदस्य,बालिका पंचायत राज सर्व टिम,तंटामुक्त अध्यक्ष,शालेय शिक्षण समिती अध्यक्ष,अंगणवाडी सेविका,आशा सेविका,बचत गट महिला व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डॉ. नंदकुमार मारुती जाधव फाउंडेशन संचालित बौद्धिक अक्षम मुलांची विशेष शाळेतील विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय स्तरावर चमकदार कामगिरी

**दैनिक युवक आधार**

**अहिल्यानगर | प्रतिनिधी :** स्पेशल ओलंपिक भारत महाराष्ट्र, डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशन अहिल्यानगर व जनसेवा फाउंडेशन लोणी यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग मुलांसाठी राज्यस्तरीय सायकलिंग व जुडो स्पर्धांचे भव्य आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत संपूर्ण महाराष्ट्रभरातून एथलेट मोठ्या प्रमाणावर सहभागी झाले होते.

यामध्ये डॉ. न. मा. जाधव फाउंडेशन संचालित बौद्धिक अक्षम मुलांची विशेष शाळेतील तीन विद्यार्थ्यांनी सहभाग घेत उत्कृष्ट कामगिरी करून शाळेचा मान वाढवला. विद्यार्थ्यांनी



स्पर्धेत एकूण 3 रौप्य पदके व 1 बेस्ट ॲथलिट पुरस्कार पटकावला.

**राज्यस्तरीय विजेते विद्यार्थी**

निहाल चोरघे – 500 मीटर सायकलिंग – द्वितीय क्रमांक (रौप्य पदक)नेहाल चोरघे – 1 किलोमीटर सायकलिंग – द्वितीय क्रमांक (रौप्य पदक) एंजल पारचे – 5 किलोमीटर सायकलिंग – द्वितीय क्रमांक (रौप्य पदक) नेहाला चोरगे – बेस्ट ॲथलिट पुरस्कार


स्पर्धेच्या पारितोषिक वितरण सोहळ्यास स्पेशल ओलंपिक भारत महाराष्ट्रच्या अध्यक्षा सौ. मेधा सोमय्या, अहिल्यानगर अध्यक्षा सौ. धनश्री ताई विखे पाटील, श्री. भगवान तलवारे (क्षेत्र संचालक, S.O.B), श्री. जितेंद्र ढोले (क्रीडा संचालक, S.O.B), तसेच समाज कल्याण अधिकारी, क्रीडा अधिकारी व इतर मान्यवर उपस्थित होते. त्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे व पदके प्रदान करण्यात आली.

यशामागील श्रम व प्रोत्साहन या उल्लेखनीय यशामागे शाळेचे विश्वस्त, मुख्याध्यापिका यांचे मार्गदर्शन,क्रीडा शिक्षक श्री. पाटील सर यांची परिश्रमपूर्वक प्रशिक्षण देण्यातील भूमिका,विद्यार्थ्यांचे सातत्यपूर्ण परिश्रम तसेच पालकांचे प्रेम, आशीर्वाद व शाळेवरील विश्वास यांचा मोठा वाटा आहे.विद्यार्थ्यांच्या या राज्यस्तरीय कामगिरीचे समाजातील सर्व स्तरांतून कौतुक होत असून, शाळेचा गौरव अधिक उंचावला आहे. विद्यार्थ्यांचे, शिक्षकांचे व पालकांचे हार्दिक अभिनंदन!

# ५० टक्के कर सवलतीचा फायदा घ्या सरपंच यशवंत पाटील यांचे आवाहन

**दैनिक युवक आधार**

**सणसर:- विकास क्षत्रिय :** राज्य शासनाच्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत थकबाकी वरील ५० टक्के कर सवलतीचा सणसर (ता. इंदापूर)नागरिकांनी फायदा घ्यावा,असे आवाहन सरपंच यशवंत पाटील व ग्रामविकास अधिकारी सचिन पवार यांनी केले आहे.त्यांनी स्वतः विशेष ग्रामसभेत ग्रामस्थांना या योजनेची सविस्तर माहिती दिली.निवासी मालमत्ता कर (घरपट्टी,पाणीपट्टी,दिवाबत्ती कर) यावरील थकबाकीत सवलत मिळेले.१ एप्रिल २०२५ पूर्वीच्या एकूण थकबाकीच्या ५० टक्के रक्कम ग्रामपंचायतकडे एकरकमी भरल्यास मूळ थकबाकीच्या रकमेत ५० टक्के सवलत मिळेल.ही सवलत ३१ डिसेंबरपर्यंत लागू असून,ती औद्योगिक, वाणिज्यिक व इतर मालमत्तांसाठी लागू नाही त्यामुळे सणसर ग्रामस्थ यांनी आपली थकबाकी भरून ग्रामपंचायततीस सहकार्य करावे असे अहवान सरपंच यशवंत पाटील व ग्रामसेवक सचिन पवार यांनी केले.



# सोयगावमध्ये संत शिरोमणी संताजी महाराज जयंती उत्साहात साजरी; समाजबांधवांचा उत्स्फूर्त सहभाग

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी विजय काळे :** शहरात संत शिरोमणी संताजी महाराज यांची जयंती उत्साह, श्रध्दाभाव आणि भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली.कार्यक्रमाची सुरुवात श्रीराम मंदिर येथे तेली समाजाच्या वतीने प्रतिमा पूजनाने झाली.यावेळी ह.भ.प. बोरसे महाराज यांच्या हस्ते संताजी महाराजांची पूजा करून अभिवादन करण्यात आले.या वेळी मोठ्या संख्येने तेली समाज बांधव तसेच शहरातील नागरिक उपस्थित होते. यानंतर विविध कार्यालये आणि शैक्षणिक संस्थांमध्येही जयंतीचे आयोजन करण्यात आले.जि.प. केंद्रीय शाळा — मुख्याध्यापक किरण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम आयोजित.,जि.प. प्रशाला— मुख्याध्यापक राठोड व भास्कर चौधरी यांच्या उपस्थितीत जयंती साजरी. नगर पंचायत कार्यालय—नगराध्यक्षा सौ.आशाबी तडवी यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम पार पडला.शिवसेना भवन,कृषी कार्यालय,तसेच इतर प्रमुख ठिकाणीही जयंती साजरी करण्यात आली.

कार्यक्रमास उपस्थित मान्यवर:कृष्णाशेट राऊत, तेली समाज अध्यक्ष राजूभाऊ दुतोंडे,कृषीभूषण अरुण सोहणी, दिलीप मालोदे, मंगेश सोहणी,गणेश हींगे, नाना सोहणी,कैलास पंडीत, विष्णू मालोदे,रमेश सोहणी, दत्तू सोहणी,दीपक बागले, शांताराम सनान्से,शिवाजी सौहणी,नाना बावस्कर, शिवाजी मालोदे,विक्रम सोहणी,नंदू आप्पा,बापू मानकर,महेश मानकर, शिवाजी बावस्कर,गटनेते अक्षय काळे,नगरसेवक, शिवसेना शहर प्रमुख संतोष बोडखे,बंटी काळे,संदीप सुरडकर,गजानन कुडके, दिलीप देसाई,बबलू शेख आदी मान्यवर उपस्थित होते.



"संताजी महाराज हे पराक्रम, सत्य आणि समाजप्रेमाचे प्रतीक आहेत.त्यांच्या विचारांचा प्रसार करत समाजाला एकत्र आणणे ही काळाची गरज आहे,"असे मत तेली समाजाचे व मार्केटिंग कमिटीचे संचालक मंगेश भाऊ सोनवणे यांनी व्यक्त केले.कार्यक्रमाच्या निमित्ताने संताजी महाराजांनी दिलेल्या समाजसेवा, ऐक्य, सत्य आणि धैर्याच्या मूल्यांचे स्मरण करण्यात आले.

# वृक्षतोडी विरोधात सिल्लोडच्या 'वृक्षवल्ली टीम' ची तपोवनात 'धडक'

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड :** नाशिक येथे 2027 मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी 'तपोवन' परिसरात 1150 एकरवर प्रस्तावित असलेल्या साधूग्रामसाठी तब्बल 1800 झाडे तोडण्याच्या महाराष्ट्र शासनाच्या विचाराला सिल्लोड येथील पर्यावरणप्रेमी संघटना 'वृक्षवल्ली टीम'ने तीव्र विरोध केला आहे.



या संघटनेचे प्रतिनिधी आणि शहरातील नामवंत अस्थिविकार तज्ञ डॉ. निलेश मिरकर यांनी प्रत्यक्ष 'तपोवन' परिसरास भेट देऊन वृक्षतोड विरोधातील आंदोलनात सहभाग घेतला. याबाबतचे निषेध वजा विनंती पत्र संघटनेने मा. तहसीलदार संजय पांडुरंग भोसले साहेबांकडे सुपुर्द केले आहे.डॉ. शेखर दौड यांनी शासनाच्या दुटप्पी भूमिकेवर नाराजी व्यक्त करत हा विचार त्वरित मागे घेण्याची मागणी केली.

शांत मार्गाने वृक्षतोड थांबवली नाही, तर आंदोलनासाठी रस्त्यावर उतरण्याचा इशारा

अजय वाघ यांनी यावेळी दिला. यावेळी धन्वंतरी डॉक्टर असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. निलेश मिरकर, डॉ. शेखर दौड, डॉ. विकास गोठवाल, डॉ. अक्षय बेवाल, डॉ. संतोष शिंदे, डॉ. दीपक अपार, डॉ. संदीप गायकवाड, डॉ. शेखर रोकडे, डॉ. अविनाश भारती, डॉ. ऋषभ मंडलेचा, अजय वाघ, रईस खान यांच्यासह अनेक डॉक्टर आणि व्यावसायिक उपस्थित होते.

# जागतिक दिव्यांग दिनानिमित्त नाशिकमध्ये भव्य सायकल रॅली; समावेशनाचा प्रभावी संदेश

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी :** जागतिक दिव्यांग दिनानिमित्त समावेशक शिक्षण आणि समाजात सर्वसमावेशक वातावरण निर्माण करण्याच्या उद्देशाने नाशिक जिल्ह्यातील निफाड येथे भव्य सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले. शनिवार, दि. ६ डिसेंबर २०२५ रोजी प्रथम संस्था, जिल्हा परिषद नाशिक आणि निफाड सायकलिस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने ही प्रेरणादायी रॅली पार पडली.रॅलीची सुरुवात सकाळी ६.३० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करून



झाली. युवानेते सचिन खडताळे आणि प्रथम फाउंडेशनच्या मार्गदर्शकांच्या हस्ते रॅलीला उत्साहपूर्ण प्रारंभ मिळाला.

या उपक्रमाद्वारे विशेषतः दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी समावेशक शिक्षण, समाजातील सहज स्वीकार आणि जागरूकता निर्माण करण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यात आले. प्रत्येक गावातील प्रतिष्ठित व्यक्तींच्या सहभागामुळे ही रॅली खऱ्या अर्थाने समावेशक ठरली.

रॅलीचा मार्ग डॉ. आंबेडकर स्मारक जनता विद्यालय नांदुर्डी आदर्श जी. प. शाळा कुंभारी वैनतेय प्राथमिक विद्यामंदिर असा होता. प्रत्येक ठिकाणी दिव्यांगता, समावेशन आणि मुलांचे हक्क यावर माहिती देऊन विद्यार्थ्यांचे, शिक्षकांचे व नागरिकांचे प्रबोधन करण्यात आले. निफाड सायकलिस्ट सदस्यांनी व्यायामाचे महत्त्व स्वतःच्या उदाहरणांसह मांडले.

यावेळी जी. प. शाळा क्रमांक एक येथे असलेल्या समावेशक कृती केंद्राची माहिती देण्यात आली. येथे उपलब्ध फिजिओथेरपी, ऑक्युपेशनल थेरपी, स्पीच थेरपी तसेच शैक्षणिक सेवांचा लाभ मोफत घेता येतो. दिव्यांग किंवा दिव्यांगत्वाची लक्षणे असलेल्या मुलांना केंद्रात मार्गदर्शनासाठी पाठवण्याचे आवाहन करण्यात आले.

रॅलीमध्ये कुंभारीचे सरपंच राजाभाऊ, निफाड सायकलिस्ट फाउंडेशनचे अध्यक्ष पांडुरंग कडवे, तसेच प्रविण तनपुरे, योगेश निफाडे, दीपक बोरसे, तुषार कोल्हे, नंदू खापरे, दीपक घंगाळे, ओंकार घंगाळे यांसह प्रथम संस्थेचे कार्यकर्ते, विविध शाळांचे मुख्याध्यापक व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तालुका स्तरीय विज्ञान प्रदर्शनात जिल्हा परिषद शाळेची विद्यार्थिनी ज्योत्स्ना पाटील हिची जिल्हा स्तरावर निवड

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव प्रतिनिधी विजय काळे :** तालुका स्तरीय विज्ञान प्रदर्शन केंद्र शाळा नुकतेच पार पडले यात प्रशालेचे विद्यार्थिनी ज्योत्स्ना पाटील हिने सादर केलेले गणितीय मॉडेल बैजिक राशी या उपक्रमाचा उत्कृष्ट सादरीकरण केले यात तिचा तृतीय क्रमांक प्राप्त झाला याबद्दल व प्राथमिक विभागातून सहभागी विद्यार्थिनी शाश्वत शेती व कचरा व्यवस्थापन हा प्रकल्प सादर केलेले गायत्री बावस्कर,देवयानी मिसाळ,कामीक्षी शिनकर व हरित ऊर्जा संबंधित सौर ऊर्जा काळाची गरज व विषयावर प्रकल्प सादरीकरण करणारे पलक गायकवाड,अक्षरा पंडित,वैष्णवी ढगे यांचा व मार्गदर्शक शिक्षक दौलतसिंग परदेशी व त्यांना सहकार्य करणारे



भास्कर चौधरी यांचा आज सत्कार पकरण्यात आला.माध्यमिक विभागातील तृतीय क्रमांक प्राप्त कु. ज्योत्स्ना पाटील हिस जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या यशस्वी बद्दल शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष व सर्व तसेच मुख्याध्यापक दादाराव राठोड व सर्व शिक्षक शिक्षिका यांनी अभिनंदन केले आहे.